# माणूस

७ डिसेंबर १९६८

चालीस पैसे




खुमासदार
बातमी...
SATHE
PICNIC
BISCUITS
SBC
आपली आवडती
साठे
पिक्निक्
बिस्किटस्
आतां मोहक
हवा-बंद कार्टन्स्मधून
उपलब्ध होत आहेत.
साठे बिस्किट ॲण्ड चॉकोलेट कं. लि., पुणें-२
heros' SBC 281MAS

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : अठ्ठाविसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** नोव्हें. १७

१६ नोव्हें. च्या अंकात 'डॅनिअल इनुये'ची कथा देऊन आपण युद्ध–कथा प्रकाशित करण्याची परंपरा अजूनही टिकवलीत याबद्दल समाधान वाटते.

**माधव वाघमारे**, पैठण

**स. न.** नोव्हें. २२

२३ नोव्हें. चा 'माणूस' वाचला, प्राचार्य व्ही. वाय. कोल्हटकर यांची 'परकीय मदत व स्वावलंबन' ही अर्थशास्त्रीय चर्चा खरोखरच वाचनीय आहे. अनंत भावे यांची 'टिकलीची गोष्ट' छापण्यामागील हेतू कळत नाही. मध्यंतरी उल्हास लुकतुके यांच्यासुद्धा कथा सामान्य वाटल्या.

**चंद्रकांत भालेराव**, डोंबिवली

**स. न.** नोव्हें. २०

१६ नोव्हें. च्या 'माणूस'मध्ये 'जेव्हा उद्या व्हिएत-नाम एक होईल.' या पुस्तकाचे परीक्षण छापण्याऐवजी प्रत्यक्ष चार कविता छापल्यात याबद्दल अभिनंदन. हृदयाला भिडणारे काव्य लिहिणारे कवि मराठीत अजूनही आहेत हे पाहून आनंद वाटला.

**श्याम रानडे**, कांदेवाडी

**मुखपृष्ठ – वैजयंतिमाला – हाटेबाजारे**

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# मॅक्नामारांची भारत-भेट

जागतिक बँकेचे अध्यक्ष श्री. मॅक्नामारा ह्यांनी आपली सात दिवसांची भारत भेट संपवून परवा, ता. २३ ला लंडनमार्गे न्यूयॉर्कला प्रयाण केले. आपल्या भारत-भेटीत त्यांनी राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, अर्थमंत्री, नियोजन मंडळाचे डॉ. गाडगीळ, अन्य अनेक मंत्री, अर्थशास्त्रज्ञ, योजनाकार, उद्योगपती इत्यादी अनेकांशी भारताच्या आजच्या आर्थिक-समस्यांवर चर्चा केली. श्री. मॅक्नामारा ह्यांनी भारताच्या विकास कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून भारताच्या आर्थिक गरजांविषयी सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचं व जागतिक बँकेमार्फत साहाय्य मिळवून द्यायच्या प्रयत्नांचं आश्वासन दिल्याच्या बातम्या आहेत. भारतीय अधिकाऱ्यांनीही शेती व कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमांना, आपल्या चर्चांतून अग्रक्रम दिल्याचं, बातम्यांवरून दिसून येत होतं, ही भारताची पावलं, मूलतः अन्न-धान्य स्वावलंबनाच्या दिशेने पडत असल्याचीच निदर्शक घटना मानायला हवी. श्री. मॅक्नामारा ह्यांनीही अनेक शेतकी प्रकल्पांना भेटी देऊन, भारताच्या प्रगतिविषयी समाधान व्यक्त केलं आहे. शेती व कुटुंब नियोजन ह्या व्यतिरिक्त अनेक औद्योगिक प्रकल्प, इतर औद्योगिक समस्या, मुंबई-कलकत्ता इत्यादी शहरांच्या विकासाचे, तिथल्या गलिच्छ वस्त्यांच्या निर्मूलनाचे व त्यांच्या पुनर्वसनाचे, ह्या मोठ्या शहरांच्या पाणीपुरवठ्याचे वगैरे अनेक प्रश्न त्यांनी विविध भारतीय अधिकाऱ्यांबरोबर चर्चिले. दौऱ्याच्या शेवटी पत्रकारांजवळ काढलेल्या उद्‌गारांवरून त्यांचं मत अनुकूल झालं असावं असं दिसतं. श्री. मॅक्नामारा आपल्या भारतभेटीचा वृत्तांत, जागतिक बँकेला सादर करतील. व कदाचित् जागतिक बँकेमार्फत भरीव मदत मिळून चौथ्या योजनेला चालनाही मिळेल. परंतु अशी मदत मिळून तात्कालिक सारवासारव होण्यापलीकडे काही भरीव कार्य होईलसं वाटत नाही; किंबहुना पाश्चात्य मदतीमुळे कर्जे फुगतील, अपरिहार्यपणे चलनफुगवटा होईल व त्यातून पुन्हा महागाई वाढेल व पुन्हा परकी कर्जाच्या फेडीसाठी नवीन सावकाराच्या शोधात वणवण सुरू होईल. हे दुष्टचक्र थांबण्यासाठी कोणत्याही भरीव योजना जोपर्यंत सरकार व नियोजन मंडळ अंमलात आणू शकत नाहीत तोपर्यंत अशी कितीही पाश्चात्य शिष्टमंडळे देशाला भेट देऊन गेली किंवा कितीही परकी मदतीच्या व परकी भांडवली गुंतवणुकीचा ओघ भारताकडे वळला, तरी सध्याची आर्थिक ओढगस्त थांबू शकणार नाही !

अनेक विभिन्न अर्थशास्त्रज्ञ निरनिराळ्या योजना प्रत्यही सुचवीत आहेत. परंतु इतर अनेक क्षेत्रांप्रमाणे, आर्थिक क्षेत्रातही, देशातल्या ह्या विचारवंतांच्या योजना

झुगारून दिल्या जाऊन पाश्चात्य अर्थपंडितांचे सल्ले, त्यांनी केलेली दिशाभूल करणारी भारतस्तुतीच सरकार अधिक ग्राह्य मानते व अशा परकी सल्ल्यासाठी वारंवार पाश्चात्यांना पाचारण करते हे देशाचं दुर्दैवच म्हटलं पाहिजे ! वीस वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही तंत्रज्ञान, मशिनरी उत्पादन व अन्न-धान्य ह्यांसाठी आम्हांला पाश्चात्य राष्ट्रांवर अवलंबून राहावं लागतं ह्याची आम्हांलाच लाज वाटली पाहिजे ! १९६७–६८ साली सर्वसाधारणपणे धान्योत्पादन उत्तम होते अशी माहिती आता उपलब्ध झाली आहे. त्याचप्रमाणे १९६८–६९ मध्येही पीक-पाणी चांगले होईल अशी आशा आहे. ह्या नैसर्गिक परिस्थितीचा जास्तीत जास्त फायदा उठवून सरकारनं धान्य आयातीत प्रचंड कपात करून, योग्य प्रकारे उपलब्ध धान्य-साठ्यांचा पुरवठा सारख्या प्रमाणात केला पाहिजे. अर्थात असं करताना, पी. एल. ४८० पासून सरकारला मिळणाऱ्या देशी चलनातही घट स्वीकारावी लागेल; पण हे केलं नाही तर परकीय आर्थिक जोखडातून सुटण्याचा योग्य मार्गही सापडणार नाही ! ◻

---

# अराजक माजविण्याचे प्रयत्न

श्री. मॅक्नामारा ह्यांच्या कलकत्ता भेटीचे वेळी विरोधी आघाडीने – विशेषत: डाव्या कम्युनिस्टांनी – कलकत्त्यात मॅक्नामारा-विरोधी निदर्शनांची धमाल उडवून दिली. श्री. मॅक्नामारा हे प्रे. जॉन्सन राजवटीत संरक्षणमंत्री होते व त्या नात्याने अमेरिकेचे व्हिएटनामविषयक धोरण ठरविण्यात त्यांचा वाटा होता. ह्या कारणामुळे डाव्यांनी त्यांच्याविरुद्ध ही निदर्शनं योजली होती. परंतु श्री. मॅक्नामारांची ह्या वेळची भारत-भेट, अमेरिकन सरकारचे प्रतिनिधी किंवा अमेरिकेचे संरक्षणमंत्री ह्या नात्यांनी नव्हती; तर जागतिक बँकेचे अध्यक्ष ह्या नात्याने होती. भारताच्या विकासविषयक गरजांचा अभ्यास करून त्याला अर्थसाहाय्य करण्याच्या शक्याशक्यतेचा विचार करण्यासाठी त्यांनी ही भेट भारताला दिली होती. अर्थात अशा परिस्थितीत, त्यांच्याविरुद्धची निदर्शनं निषेधार्हच गणली जातील. – भारतानं परकीय मदत घ्यावी किंवा नाही हा प्रश्न इथे अर्थातच बाजूला राहतो ! त्यांच्या भारतभेटीचा उद्देश आणि त्यांच्या निदर्शनांची कारणं, ह्यांचा अर्थाअर्थी काहीच संबंध नव्हता, आणि म्हणूनच, ह्या निदर्शनांना वेगळाच राजकीय वास येतोयसं वाटतं. १९६७च्या निवडणुकांनंतर आघाडी सरकार बंगालमध्ये अधिकारारूढ झालं. परंतु डाव्यांच्या हालचाली, नक्षलवाडीचा उठाव, राज्यसरकारची अकार्यक्षमता, घेरावचं सत्र ह्यांमुळे केंद्रशासनाला हस्तक्षेप करून बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट पुकारावी लागली. आता बंगालमध्ये मुदतपूर्व निवडणुकांचे वेध लागले आहेत. अनागोंदी

कारभारामुळे व डाव्यांच्या लोकशाहीविरोधी पुंडाईमुळे जनमत पुन्हा, अनिच्छेने का होईना, पण निश्चितपणे कॉंग्रेस व उजव्या पक्षांकडे झुकले आहे. त्या जनमताचं वारं पुन्हा डावीकडे वळविण्यासाठी हा निरर्थक निदर्शनांचा पसारा आहे. ही निदर्शनं, हुल्लडबाजी, बसेस-ट्राम्सना लागणाऱ्या आगी, सरकारी व खाजगी मालमत्तेचं नुकसान, पोलीसस्टेशनांवरचे हल्ले – हे डावे कम्युनिस्टप्रणीत; अराजक माजविण्याचे व त्यांतून स्वपक्षाचे घोडे पुढे दामटायचे रुळलेले मार्ग आहेत.

निवडणुकांच्या रिंगणात उभ्या असलेल्या एका गटानं अराजकवादाचे हे मार्ग अवलंबले आहेत, तर अधिकारारूढ असलेल्या केरळमधील गटानं गटा-गटांत असंतोष माजवून, केंद्राविरुद्ध अघोषित युद्ध पुकारून आणि राष्ट्राच्या हितांना मारक ठरणारे अनेक निर्णय घेऊन, अराजकाला निमंत्रण द्यायचे उपद्व्याप चालवलेले आहेत. १९६७ साली मार्क्सवादी ( डाव्या ) कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली डावी आघाडी सरकारारूढ झाली. श्री. नंबुद्रिपादांच्या सरकारनं केरळात कुठलीही सामाजिक, औद्योगिक, आर्थिक क्रांती घडवून आणलेली नाही. किंबहुना नंबुद्रिपाद सरकारची कारकीर्द यत्किंचितही यशस्वी झालेली नाही. उलट अन्न-धान्य प्रश्नावरून केरळीय जनतेला केंद्राविरुद्ध भडकावणं,केंद्र-कर्मचाऱ्यांच्या संपात केंद्राच्या सूचना साफ धुडकावून लावणं, स्वतःच्या निष्क्रियतेचं व पराभवाचं माप सर्वस्वी केंद्रावर लादणं वगैरे पावलं टाकून केरळ सरकारनं केंद्र सरकारशी जवळजवळ अघोषित युद्धच पुकारलेलं आहे. त्याचबरोबर मुस्लीम लीगच्या दडपणाला बळी पळून मालापुरम् ह्या मुस्लीम बहुसंख्य असलेल्या जिल्ह्याची निर्मिती करण्याचं ठरवून, आणि अंगदीपुरम् येथील ताली मंदिरात पूजा-बंदी लागू करून जातीय वैमनस्य वाढवायचा उपद्व्याप केरळ सरकारनं चालवलेला आहे. ताली मंदिरातले भजनी-गण आणि शेजारच्या मशिदीतले मुसलमान ह्यांच्यातलं वाक्युद्ध गेले काही दिवस जोरात चालू आहे ! येनकेन प्रकारेण केरळात असंतोष माजवायचा, केंद्राला नित्यनियमित शिव्या द्यायच्या, आणि केंद्राचा रोष स्वीकारून केंद्रीय हस्तक्षेपाची वाट पाहायची असलं धोरण केरळ सरकारनं स्वीकारलेलं दिसतं ! केंद्रीय हस्तक्षेपामुळे नवीन अराजक केरळात माजवणं व त्यांतून स्वपक्षांची घसरती घडी पुन्हा सावरणं हा श्री. नंबुद्रिपादांचा जुनाच डाव, ते पुन्हा खेळत असावेत !

ह्याच वेळी, श्री. नागी रेड्डी ह्यांनी पूर्वीच घोषित केल्याप्रमाणे, नक्षलबाडी गटाचे केरळातले कार्यकर्ते कार्यरत झाले आहेत. २२ नोव्हेंबर आणि २४ नोव्हेंबर ह्या दोन दिवशी, अवघ्या अठ्ठेचाळीस तासांच्या कालावधीत सहस्र कम्युनिस्ट स्वयंसेवकांनी केरळातल्या तेलिचेरी व पुलपल्ली या दोन पोलीस स्टेशनांवर हल्ले चढविले व ती पोलीस स्टेशन्स ताब्यात घ्यायचा प्रयत्न केला. पुलपल्ली स्टेशनवरील हल्ला अधिक आखणीपूर्वक होता, आणि त्यात एक वायरलेस ऑपरेटर जागच्या जागी ठार झाला; एक सबइन्स्पेक्टर व आणखी दोन पोलीस कर्मचारी

भयंकर जखमी झाले तर संपूर्ण वायरलेस-सेट उद्ध्वस्त करण्यात आला. त्याच वेळी पालघाट येथील डाव्यांच्या बैठकीत संपूर्ण मलबार पट्टीत नक्षलबाडी थाटाच्या उठावाची मालिका आखण्याचं व नक्षलबाडी गटाच्या तिसऱ्या कम्युनिस्ट पक्षाची उभारणी करण्यात आल्याचं सांगण्यात आलं. निवडणुका, घटना इत्यादींवर ह्या गटाचा विश्वास नाही, तर सशस्त्र उठावांनी सत्ता हस्तगत करण्यावर त्यांचा भर आहे! म्हणजे पहिल्या दोन गटांनी निर्मिलेली अराजकं ह्यांच्या सशस्त्र उठावाला योग्य अशी पार्श्वभूमी तयार करणारी तर नाहीत ना? ही अराजकं माजवली जात आहेत डावीकडे झुकलेल्या तीन भिन्न-भिन्न गटांकडून, पण ती एकमेकांना पूरक ठरावीत अशा पद्धतीनं माजवली जात आहेत असं वाटतं मात्र नक्की! प्रश्न आहे तो हा की, ह्या अराजकवाद्यांविरुद्ध एखादी मजबूत आघाडी राष्ट्रवादी विचारसरणीचे पक्ष आपसातले मतभेद विसरून उघडू शकतील का हा!

---

# मटक्याचं राष्ट्रीयीकरण

फक्त एक रुपया खर्च करा आणि त्वरित श्रीमंत व्हा — गांधी जन्मशताब्दीचा सोहळा चालू असताना आणि मुंबईच्या चैत्यभूमीवर बौद्ध धम्म सोहळयाची तयारी चालू असताना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी हा संदेश तुम्हां-आम्हांला दिला आहे! काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात लॉटऱ्या मोठ्या प्रमाणावर चालू होत्या त्या वेळी लॉटऱ्यांमुळे जुगारी वृत्ती बळावते असं सांगून ह्या सर्व लॉटऱ्या कायद्याने बंद केल्या गेल्या. आता देशभर 'सत्यं शिवं सुंदरम्'चे घोष चालू असताना, गांधींच्या नीतिपाठाचे धडे देशाला दिले जात असताना नागपूरहून मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईकांनी घोषणा केली आहे की, "महाराष्ट्र सरकार सरकारी लॉटरी सुरू करण्याचा विचार करीत आहे." महाराष्ट्र सरकारला पैशाची चणचण भासते हे एकदम मान्य! त्यासाठी सरकारी काटकसर, मंत्र्यांच्या अनावश्यक दौऱ्यांना फाटा, सरकारी कार्यालयातले प्रचंड अपव्यय टाळणे, इ. काही उपाय पण आहेत. पण हे उपाय थोडेसे कष्टाचेच नाहीत का? त्यापेक्षा सरळ जागतिक बँकेकडून कर्ज घ्यावं, लॉटरी सुरू करावी हेच मार्ग केव्हाही सोपे आणि जवळचे! आणि शिवाय दारू-बंदीच्या घोषणा आणि त्यांची काटेकोर अंमलबजावणी ह्यांचा जसा अन्योन्य असा काहीच संबंध नाही त्याप्रमाणे लॉटरी म्हणजे जुगार आहे म्हणणं आणि गांधीनीतिच्या गप्पा मारणं आणि प्रत्यक्ष लॉटरी सुरू करणं ह्यांचाही संबंध मुळीच नाही!

गेल्या काही महिन्यांत महाराष्ट्र सरकारनं मटक्याविरुद्ध आघाडी उघडलेली आहे. आता सरकारनं मटक्याचे राष्ट्रीयीकरण करावं — पैसाही जास्त मिळेल.

**सु. ल. सोमण**



# ग्यानबाचं गुऱ्हाळ

पश्चिम पाकिस्तानात भावलनगर या गावचा चित्तथरारक वृत्तांत कळला की नाही ? फार ऐकण्यासारखा आहे. या भावलनगरात माशा मारण्याची मोहीम काढण्यात आली. मासे नव्हेत, माशा. आणि ही मोहीम अगदी युद्धपातळीवरून चालू केली. दिसेल ती माशी मेलीच पाहिजे असा निर्धार यापाठीमागे होता. या जिद्दीने माशा मारण्यात आल्या आणि नंतर त्या एकत्र करण्यात आल्या. त्यांचे वजन आठ मण भरले. ही माहिती सांगोवांगीची नव्हे. पाकिस्तानचे राज्यमंत्री श्री. महंमद यासीन यांनीच सांगितली आहे. अशीच मोहीम कम्युनिस्ट चीननेही क्रांती होऊन राजसत्ता हाती आल्यावरोबर पहिल्या वर्षी हाती घेतली होती म्हणतात.

ही बातमी वाचल्याबरोबर माझ्या मनात चीन आणि पाकिस्तान यांच्याबद्दल पहिल्याप्रथम प्रेम दाटून आले. या दोन देशांत काही चांगले चाललेले असते यावर आपल्या मंडळींचा विश्वासच बसत नाही, नाही का ? निदान मला तरी तसे वाटत होते खरे. त्यामुळे हे वृत्त वाचले आणि–' धन्य ते संताजी धनाजी ' या चालीवर ' धन्य ते चीन–पाकिस्तान ' असे उद्‌गार तोंडातून निघाले. मनात आले की, ही मोहीम सुरू करण्यासाठी आपल्या देशासारखा लायक देश नाही ! आपल्याकडे ती सुरू व्हायलाच पाहिजे. येथे माशाही खूप आणि माणसेही रगड. वर्षानुवर्षे हा उद्योग चालला तरी तो बंद होण्याची धास्ती नाही. मुख्य म्हणजे माशा मारीत बसणे हा आमचा परंपरागत धंदा आहे. यात नवे काही नाही. पाक वॉर बाऊंड्रीवर तो करणे एवढेच नव्हे. पण आमच्याकडे हे होईल काय ? युद्धपातळीवर याची आखणी करण्यात येईल काय ? आणि आलीच तर गोष्टी कशा घडतील ? या मोहिमेचा शेवट कोणत्या प्रकारे होईल ?

विचार करता करता माझी एकदम समाधी लागली. ( ही माझी नेहमीचीच खोड आहे.) डोळ्यांसमोर पुढची रम्य चित्रे दिसू लागली. ठिकठिकाणच्या बातम्या लख्ख वाचता येऊ लागल्या. भविष्यकाळाचा पट हलके हलके उलगडत चालला...

पहिलेच चित्र दिसले ते असे.

**चौथ्या योजनेत मक्षिका-नाश मोहीम !**

नवी दिल्ली :– " चौथ्या पंचवार्षिक योजनेत ' मक्षिकानाश ' हे एक प्रमुख लक्ष्य ठरविण्यात आले असून त्यासाठी पंचवीस कोटी, तीस लाख, एकूणसत्तर

हजार तीनशे दोन रुपये बाजूला काढून ठेवण्यात आले आहेत. राष्ट्रीय नियोजन मंडळाच्या नुकत्याच भरलेल्या बैठकीत वरील महत्त्वाचा निर्णय कडाक्याच्या चर्चेनंतर करण्यात आला. ही वार्ता प्रसिद्ध होताच सर्व राज्यांच्या मुख्य मंत्र्यांनी तिचे स्वागत केले. विरोधी पक्षाच्या गोटात याची संमिश्र प्रतिक्रिया दिसली. एक कम्युनिस्ट खासदार म्हणाले की, ही घोषणा निराशाजनक आहे. आपल्या देशातील बेकारीच्या प्रश्नाशी या मोहिमेची सांगड घातल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. त्या दृष्टीने ही तरतूद अपुरी वाटते. सरकारने बेकारांची आणि माशांची, दोघांचीही घोर फसवणूक केली आहे. यावर काँग्रेस पक्षातील एक आर्थिक तज्ज्ञ बोलले की, एका रुपयास दहा माशा याप्रमाणे हिशेब केला तरी अब्जावधी माशांचा संहार या योजनेमुळे होईल आणि हाही फायदा कमी म्हणता येणार नाही. माशा मारीत बसणे हा भारताचा परंपरागत, प्राचीन व्यवसाय असल्यामुळे या मोहिमेस भरपूर यश मिळेल असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमचा दिल्लीचा बातमीदार कळवतो की, आरोग्य आणि कुटुंबनियोजन मंत्री डॉ. चंद्रशेखर यांच्याकडेच या मोहिमेची सूत्रे सोपवावीत असे मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठरले असले तरी डॉ. चंद्रशेखर ही सूत्रे स्वत: घेण्यास फारसे उत्सुक नाहीत. मंत्रिमंडळातील कोणीही मंत्री हे काम तितक्याच जबाबदारीने करू शकेल असे त्यांचे मत आहे. शिवाय, माशा निर्माण करून मग त्यांचा बंदोबस्त करण्यापेक्षा आहेत त्या सध्याच्या माशांनाच लूप बसविल्यास ही मोहीम आपोआप यशस्वी होईल असे त्यांचे म्हणणे असल्याचे मला समजले. तथापि उघडउघड विरोध ते करणार नाहीत असे दिसते. १ मे या लाल क्रांतिदिनी या मोहिमेचा शुभारंभ होईल......"

—आणि मग पुढच्या बातम्या दिसल्या त्या अशा :

## ह्यांचे अनुकरण करा

नवी दिल्ली :— मक्षिका नाशाच्या मोहिमेची तयारी जोरात चालू आहे. परवाच या मोहिमेचे बोधचित्र पसंत करण्यात आले. एक माणूस गादीवर झोपला आहे आणि त्याने पाळलेले माकड त्याच्या उशाशी बसले आहे. त्या माणसाच्या नाकावर बसलेली माशी मारण्यासाठी माकडाने जवळच ठेवलेली तलवार हातात घेऊन उगारलेली आहे असे ते चित्र आहे. त्या चित्राखाली एकच बोधवाक्य आहे— '**ह्याचे अनुकरण करा**' म्हणजे माणूस मेला तरी हरकत नाही, पण माशी सुटता कामा नये या जिद्दीने ही मोहीम चालू ठेवा. पसंत केलेले हे चित्र आता देशभर सर्वत्र लावण्यात येईल आणि खेड्यापाड्यांपर्यंत त्याचा प्रसार होईल असे दिसते. मात्र या माकडाचा तोंडवळा कोणत्या पुढाऱ्याप्रमाणे असावा या विषयी निवड समितीत मतभेद झाले आहेत. झोपलेल्या माणसाचा तोंडवळा आणि माकडाचा चेहरा अशी दोन तोंडे दोघांना देऊन ही भांडणे बहुधा मिटविण्यात येतील असे वाटते.

बोधचिन्हाप्रमाणे या मोहिमेचे बोधवाक्यही पसंत करण्यात आले आहे. तेही देशाच्या कानाकोपऱ्यात विजेच्या खांबाखांबांवर, झाडाझाडांवर, देवळादेवळांवर लिहिले जाईल. '**प्रथम प्रहारे मक्षिकाघात:**' हे वाक्य सर्व दृष्टीने योग्य ठरविण्यात आले आहे. (तामीलनाडमध्ये मात्र संस्कृत वाक्य न लिहिता 'प्रथमचेळुवरु इंडुवण्णूवरु' असले काही तरी वाक्य लिहिले जाईल असें म्हणतात. असो !

## पाच माशा मारून उद्घाटन

भोपळापूर, दि.........भोपळापूर सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात माणकोजीराव हिरोजीराव मातकर यांच्या हस्ते या मोहिमेचे उद्घाटन झाले. साखर कारखाना असल्यामुळे माशांना तोटा नव्हताच. अध्यक्षांच्या तोंडाभोवतीही शेकडो माशा घोंघावत होत्या. माणकोजीरावांनी पहिल्याच हातात पाच माशा मारून या मोहिमेस स्फूर्तिदायक प्रारंभ केला. नंतर त्यांनी मारलेल्या पाच माशांचा तेथेच जाहीर लिलाव करण्यात आला. शेट ढब्बूलाल खाबूलाल यांनी पाचशे रुपयाला त्या तेथेच विकत घेऊन सर्वांची वाहवा मिळवली. नंतर केलेल्या भाषणात माणकोजीराव मातकर म्हणाले, " बंधुभगिनींनो, आपण एकेकाळी मानसं मारलेली हैत तिथं माशा मारनं काय आवगड है ? हा ग्रामोद्योगच है. आपली काई हारकत न्हाई. प्रत्येकानं दिवसभराच्या टायमातं कमीतकमी धा तरी माशानला रट्टा मारून हानलं पायजे. आमी जर एखांद्या मानसाच्या पाठीत बकमा घातला तर तो पक्कन् खालीच बसतो. असाच दनका तुमीबी ठेवा. आपल्या ह्या जिल्ह्यातून पुढच्या सालाला निदान एक कोटी मेलेल्या माशीची निर्यात दिल्लीला केली पायजे. आपल्या जिल्ह्याचं वैशिष्ठ आपन कायम राखलं पायजे. सुशिक्षित मानसं ह्यात उदाशीन आहेत ही गोष्ट बराबर न्हाई. त्यांनी पण ह्यात भाग घेतला पायिजे......"

## 'निर्मक्षिका ग्रामा'त अफरातफर

फुगेवाडी, दि.........मक्षिकानाशाच्या मोहिमेसाठी येथे आलेल्या दहा हजार रुपयांची अफरातफर झाली असून त्यामुळे गावात फारच खळबळ उडाली आहे.

या बाबतीत तपास केल्यावर असे समजले की, येथील ग्रामपंचायतीचे सरपंच आणि ग्रामसेवक यांच्याकडे ही रक्कम आलेली होती. त्यांच्या आदेशानुसार लोकांनी बऱ्याच माशा मारून त्यांच्या स्वाधीन केल्या. विरोधी गटाच्या म्हणण्यानुसार ही संख्या २५५७३२ इतकी आहे. त्यांपैकी पहिला एक लाख मारलेल्या माशांचा हप्ता मुंबईला पाठवून दिल्याची पावती आहे. बाकीच्या माशांचे काय झाले याचा मात्र काहीच शोध लागत नाही. सरपंच आणि ग्रामसेवक यांनीच या माशा गडप केल्या असा त्यांचा आरोप आहे. गावोगाव हेच प्रकार चालले असून माशा फक्त कागदोपत्री मरत आहेत आणि खऱ्या माशा गावात तशाच बेगुमानपणे हिंडत आहेत

अशीही गावकऱ्यांची तक्रार आहे. यात आश्चर्याची गोष्ट अशी की चारच महिन्यां पूर्वी 'निर्मक्षिका ग्राम' म्हणून या गावचा गौरव करून तेथे आरोग्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गौरव समारंभ झाला होता. या उलट यंदा इतक्या माशा आपण गेल्या चाळीस वर्षांत कधी पाहिल्या नव्हत्या असे गावातील वृद्ध लोक जीव तोडून सांगत आहेत. या प्रकारची पोलीस चौकशी सुरू झाली आहे.

मुंबई, दि........महाराष्ट्र राज्य विधानसभेत मक्षिकानाश मोहिमेवर प्रश्नोत्तराच्या वेळी पुढील माहिती देण्यात आली.

या मोहिमेत ३०० गावे निर्मक्षिका झाली. १००० गावे अर्ध-निर्मक्षिका आहेत. ५००० गावांत माशांची अंडी शोधण्याचे काम जारीने चालू आहे. पुढील पंचवार्षिक योजनेत राज्यातील निम्मी गावे निर्मक्षिका होतील असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. या कामासाठी आत्तापर्यंत दोन कोटी वीस लाख रुपये खर्च झाले. त्यांपैकी दीड कोटी रुपये नोकरवर्ग व प्रतिबंधक औषधे यांवर खर्च झाले. सुमारे १५०० अफरातफरीची प्रकरणे चालू आहेत.

यांवर मंत्री आणि विरोधीपक्षीय सभासद यांत पुढीलप्रमाणे प्रश्नोत्तरे झाली.

**प्रश्न**–राज्यातील किती खेड्यांत माशा मुळातच नव्हत्या ?

**उत्तर**–सांगता येणार नाही.

**प्रश्न**–हे काम शहराच्या गलिच्छ वस्तीतूनही का सुरू करण्यात आले नाही ?

**उत्तर**–त्याचा विचार चालू आहे.

**प्रश्न**–एकूण मारलेल्या माशांची संख्या किती होईल ?

**उत्तर**–आकडेवारी मागवावी लागेल.

**प्रश्न**–मग ती तुम्ही मागवत का नाही ?

**उत्तर**–विचार चालू आहे.

**प्रश्न**–सरकारी सचिवालयात आणि विधानसभेच्या आवारातही अजून माशा घोंघावत आहेत ही गोष्ट खरी आहे काय ?

**उत्तर**–सार्वजनिक हिताच्या दृष्टीने ही माहिती सांगणे इष्ट होणार नाही.

**प्रश्न**–निर्मक्षिका गावांपैकी काही गावे निर्मनुष्यच आहेत ही गोष्ट खरी आहे काय ? (हशा)

**उत्तर**–होय. विरोधी पक्षाचे सन्मान सभासद प्रचारासाठी तेथे गेल्यामुळे काही गावे ओसाड पडली आहेत ही गोष्ट खरी आहे. (हशा)

एवढ्या ज्ञानवर्धक प्रश्नोत्तरानंतर सभागृहाचे नेहमीचे कामकाज सुरू झाले......

मला वाटते, एवढे वर्णन पुरे झाले ! आपल्याकडे माणसे एरवी नुस्ती माशा मारीत बसतील. पण त्याची मोहीम केली तर यापेक्षा वेगळे काय घडणार ?......

**–ग्यानबा**

# डालिया पेन आणि डॉक्टर लेर्नर

**व्यं. न. कुलकर्णी**

वैभव दाराशी हात जोडून उभं आहे, संपत्तीचा वाढता साठा बँकांत फुगत आहे, आरामी जीवन रोजचंच आहे. खायला, प्यायला, ल्यायला, कश्शा कश्शाला तोटा नाही !

लाखाच्या किमतीची रोल्स रॉइस मोटारगाडी दिमतीला आहे. भारतातल्या कलेक्टरलाही कधी न दिसणारा भरभक्कम पगार मिळविणारा विश्वासू ड्रायव्हर बँक्स त्या गाडीचीच काळजी घेतो असं नाही तर धनी–धनिणीलाही फुलाप्रमाणं जपतो, त्यांच्या कन्येला अंगाखांद्यावर खेळवतो.

या धनिणीचं नाव आहे डालिया पेन. युरोपमध्ये ती सुविख्यात आहे एक सौंदर्यशाली अभिनयसम्राज्ञी म्हणून. काळेभोर केस, सुडौल बांधा नि भावदर्शी डोळे. बी. बी. सी. च्या टेलिव्हिजनवरचे तिचे कार्यक्रम अतिशय लोकप्रिय होतात.

लंडनमधल्या 'सोसायटी'त म्हणजे लक्षाधीशांच्या मेळाव्यात डालिया पेन आणि तिचा पती डॉ. ॲलेक् लेर्नर यांचं स्थान फार वरचं गणलं जातं. सोसायटीच्या पार्ट्या, नृत्यं, मेळावे, संमलने, भोजने इत्यादी प्रसंगी उपस्थित राहण्याकरता या जोडप्यांची आर्जवे केली जातात. त्यांच्या हजेरीशिवाय कोणत्याच समारंभांना शोभा येत नाही –!

डॉ. लेर्नर ज्या एका कापडनिर्मितीच्या कंपनीत डायरेक्टर आहेत तिची इंग्लंडमध्ये १५७ दुकाने आहेत. डॉ. लेर्नर यांच्या वाट्याला दरसाल लाखांच्या रकमा येतात. डालिया पेनलाही तशीच लाखांची प्राप्ती होत असते !

असं हे लक्षाधीश कुटुंब म्हणत आहे,

"आम्हांला या सुखाचा अगदी कंटाळा आला आहे !"

## भीती, आनंद, रोमांच

डालिया पेन हे मिसेस लेर्नर यांचं कौमार्यावस्थेतलं नाव. त्या नावानंच त्या पूर्वी प्रसिद्धीच्या झगझगाटात आल्यानं व्यवसायाच्या सोयीकरता आता विवाहानंतरही त्यांनी तेच नाव चालू ठेवलं आहे.

दोघेही धर्माने, वंशाने ज्यू आहेत.

त्यांनी आता लंडनमधलं चनीचं जीवन सोडून इस्रायलला जायचं निश्चित केलं

आहे. डालिया आपल्या लाखांच्या प्राप्तीवर, झगमगाटावर, युरोपमधल्या लोकप्रियतेवर पाणी सोडून इस्त्रायलमध्ये नव्या जीवनाचा श्रीगणेशा गिरविणार आहे. डॉ. लेर्नर यांनाही आपलं कुबेरपद सोडावं लागणार. कारण, इंग्लंडमधील सध्याच्या नियमानुसार फक्त एक लाख रुपयाएवढीच रक्कम ते इस्त्रायलला आपल्याबरोबर नेऊ शकतील! कंपनीतील त्यांचं अर्थदायी संचालकत्व अर्थातच जाणार! पण या साऱ्याची त्या दोघांनाही पर्वा नाही.

"आम्ही इस्त्रायलमध्ये इतरांप्रमाणंच जगू, काय जे करता येईल ते तिकडेच करू! लंडनमधल्या या विलासी जीवनात मौज वाटत नाही!" असं या पतिपत्नींचं मत झालं आहे.

"आहे काय असल्या आयुष्यात राम? आजच्याप्रमाणंच उद्याचा दिवस उगवतो. ऐषआरामातच मावळतो. तीच ती स्तुतिस्तोत्रं ऐकावी, रोल्स रॉइसमध्ये डौलानं फिरावं, सोसायटीच्या पार्ट्यांत नटूनथटून रंगावं! पैसे दररोज बँकांत जमा होत असतातच. उत्कृष्ट खाद्यपेये टेबलावर तयार राहतातच. नोकरचाकर नमूनलवून आपली सेवा करतातच! छी: हे काय जीवन म्हणायचं? अंगावर भीतीचे, आनंदाचे, औत्सुक्याचे, अपेक्षेचे, अपेक्षापूर्तीचे रोमांच उठविणारं काही आहे का या आयुष्यात?" डालिया म्हणते.

नोकरांना त्यांनी केव्हाच नोटीसा दिल्या आहेत. रोल्स रॉइस गाडी विकणार असल्याचंही जाहीर करून टाकलं आहे. लंडनमधील त्यांचे मित्र म्हणत आहेत, "हा काय वेडेपणा चालवलाय् तुम्ही? इथल्या सुखी जीवनावर लाथ मारून तुम्ही इस्त्रायलसारख्या लहान, नव्या देशात कष्टाचं आयुष्य पत्करणार याला म्हणावं तरी काय? बघा हं, नंतर पश्चात्ताप होईल!"

## इस्त्रायलमधलं जीवन 'जिवंत' आहे!

पण लेर्नर कुटुंबाला खात्री आहे की आपण करतो आहोत तेच अगदी बरोबर आहे.

कुबेराचं ऐश्वर्य, आरामातलं सुख सोडून इस्त्रायलला जावंसं का वाटतं या कुटुंबाला?

डालिया पेनचं शिक्षण इस्त्रायलमध्येच झालं. एका नृत्यसमारंभात डालियाचं लोभस नृत्य पाहून डॉ. लेर्नर भुलले. कामानिमित्त ते नेहमी लंडनहून इस्त्रायलला जात असत. उभयतांचा परिचय वाढला, प्रणय रंगला. नंतर ते विवाहित झाले. डालिया लंडनला आली.

एकदा सुटीकरता म्हणून दोघं इस्त्रायलला आली. पुढच्याच आठवड्यात अरब–इस्त्रायल युद्ध पेटलं. डालियानं पूर्वी लष्करी शिक्षण घेतलं होतंच. तिनं लष्करी गणवेश चढविला. डॉ. लेर्नरना आपल्या वैद्यकीय ज्ञानाची आठवण झाली. इस्त्रा-

यलच्या लष्कराला वैद्यकीय मदत करण्याच्या कामात त्यांनी पुढाकार घेतला. औष-धांचा पुरवठा करण्याचं काम त्यांनी आपणाकडे घेतलं...

ते युद्ध होतं!

इस्रायली तरुण देशाकरता लढत होते. पतन पावत होते. अश्रूंचे लोट वाहत होते. विजय मिळवीत होते. आनंदाला उधाण येत होतं. सारा देश घुसळून निघत होता. हर्षखेदांच्या लाटांवर आख्खं इस्रायल राष्ट्र हेलावत होतं. बंदुकांचे आवाज, तोफांचे दणदणाट, बॉंबवर्षावांच्या कर्कश किंकाळ्या....

विजयोन्मादाची बेहोषी –!!!

इथलं जीवन जिवंत होतं!

इथं काहीतरी घडत होतं, घडवीत होतं!

इथल्या अस्तित्वात रोमांच होते!

बस्स्, स्वतःच्या देशात, देशबांधवांच्या खांद्याला खांदा लावून त्यांच्याशी समरस होण्यात काय मौज आहे!

नाहीतर लंडनमधले ते कंटाळवाणे सुखोपभोग! बँकांतले ते आकडे, फायद्याचे ते हिशेब! ती खोटी, नकली, बेगडी "सोसायटी!"...सारं निर्जीव, कृत्रिम, खोटं!

## आणि बँक्सही

"अहो, पण तुम्ही इस्रायलमध्ये करणार तरी काय?" या लंडनमधल्या मित्रांच्या प्रश्नाला उत्तर देताना लेर्नर दांपत्य म्हणतं, "ते आम्हांला तरी कुठं माहीत आहे! पण आमच्या तेथील वास्तव्याचा काहीतरी उपयोग आमच्या देश-बांधवांना होईल असं मात्र आम्हांला नक्की वाटतं!"

लंडनमधलं बिऱ्हाड त्यांनी आवरायला सुरुवात केली आहे. नोकराचाकरांना पगार आणि पेन्शनही देण्यात आलं आहे.

त्यांचा जुना स्वामिभक्त ड्रायव्हर बँक्स याला तर खूप मोठी पेन्शन मिळाली आहे. पण तो म्हणतो,

"मला ना पोर, ना बाळ! तुमचा संसार हाच माझा संसार. तुमच्याशिवाय मला कसे चैन पडणार? मला तुम्ही पेन्शन दिले आहेच, तेव्हा माझं काही तुम्हांला ओझं वाटायला नको...!"

बँक्सच्या डोळ्यांतली आसवं पाहून डालिया विरघळली.

"बरं तर चल तूही आमच्याबरोबर. माझ्या छोट्या लेकीला तरी तुझ्याशिवाय कुठं चैन पडते?"

O

# नवीन शेतीविकास नीती

१९६६–६७ च्या खरीप हंगामापासून भारताची 'नवीन शेतीविकास नीती' (न्यू ॲग्रिकल्चरल स्ट्रॅटेजी) अंमलात आली. पारंपरिक बियाणाहून अधिक उत्पन्न देणाऱ्या सुधारलेल्या बियाणांवर (हाय यील्डिंग व्हरायटीज प्रोग्रॅम) ही नीती प्रामुख्याने आधारित आहे. सुधारलेल्या बियाणांचे सामर्थ्य एवढे आहे की भारतीय शेतीत त्या योगे क्रांती घडवून आणली जाऊ शकेल. 'मिरॅकल सीड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बियाणांमुळे उत्पादन दोन ते तीन पटींनी वाढू शकते.

नवीन शेतीविकास नीती थोडक्यात अशी आहे की, जेथे पाणीपुरवठा निश्चितपणे व नियमितपणे उपलब्ध आहे त्या भागात अधिक उत्पादन देणाऱ्या बियाणांचा प्रसार करावयाचा, सुधारलेल्या बियाणांचा जिराईत जमिनीत विशेष उपयोग होत नाही. त्यांस आवश्यक ती खते उपलब्ध करून द्यावयाची व सुधारलेल्या पद्धतींचा अंमल करायाचा. अन्न महामंडळाने मागे एकदा अशी सूचना केली होती की भारतातील ४८ जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित केले तर आपला अन्नधान्याचा प्रश्न सुटू शकेल. नवीन शेतीविकास नीती या सूचनेचीच सुधारलेली आवृत्ती आहे असे म्हणावयास हवे. एच्. वाय्. व्ही. पी. या सुधारलेल्या बियाणांच्या कार्यक्रमावर नव्या धोरणात एवढी भिस्त आहे की पुढील तीन वर्षांत धान्य उत्पादनात जी वाढ संकल्पित आहे, तीपैकी सिहाचा वाटा या कार्यक्रमाखालील जमिनीतून यावयाचा आहे.

चौथ्या पंचवार्षिक योजनेत या कार्यक्रमाखाली ५ कोटी एकर जमीन आणण्याचा संकल्प आहे. हाय यील्डिंग व्हरायटी प्रोग्रॅमखाली निवडलेल्या जिल्ह्यांत सघन शेती मोहीम (इन्टेन्सिव्ह अॅग्रिकल्चरल प्रोग्रॅम) लागू होईल. उदाहरणार्थ, हरियाना राज्यातील कर्नाल जिल्हा १९६७-६८ सालासाठी या योजनेखाली निवडण्यात आला आहे. या योजनेमुळे १·१३ लाख टनांचे जादा उत्पादन या जिल्ह्यात होईल, असा अंदाज आहे.

पाणीपुरवठा निश्चित असलेल्या भागांपुरते लक्ष केंद्रित केल्याने संघटनात्मक व यंत्रणात्मक प्रश्न काहीसे सुकर होतील. सुधारलेल्या बियाणांच्या लागवडीचे पथ्य फार असते. रासायनिक खतांचा वाजवी प्रमाणांत वापर व त्या त्या बियाणास योग्य अशी लागवडीची पद्धत यांची या कार्यक्रमाच्या यशास फार आवश्यकता आहे. सुधारलेल्या बियाणांसाठी सहा ते आठ वेळा प्राथमिक नांगरट करावी लागते. त्यानंतर खताचा योग्य प्रमाणात पहिला डोस, बियाणाची योग्य त्या व विशिष्ट खोलीवर पेरणी वगैरे सुधारलेल्या पद्धती अंमलात न आल्या तर सुधारलेल्या बियाणांचा उपयोग व्हावा तितका होत नाही.

त्यामुळे मर्यादित प्रमाणावरचा हा शेतीसुधारणा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी-देखील फार मोठ्या तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता आहे. सध्या शेतीविषयक प्रचाराचे व शिक्षणाचे काम विकास योजना यंत्रणेच्या द्वारा केले जाते. यामध्ये दर विकास गटास एक पदवीधर शेती अधिकारी व सुमारे दहा ग्रामसेवक असे प्रमाण पडते. ग्रामसेवकांस अत्याधुनिक सुधारलेल्या बियाणांचे व पद्धतीचे ज्ञान असणे संभाव्य नाही. त्यामुळे प्रचारास प्रतिसाद देण्याच्या सद्बुद्धीने जे शेतकरी सुधारलेल्या बियाणाची लागवड करतील त्यांना वेळेवर मार्गदर्शन न लाभल्याने त्यांचे नुकसान होण्याचा संभव आहे.

तेव्हा नवीन शेतीविकास नीती सध्याच्या यंत्रणेमार्फत न राबविता पूर्णपणे तांत्रिक व अधिक गतिमान अशा यंत्रणेकडे सोपवावयास पाहिजे. तंत्राच्या प्रसारा-बरोबरच, आवश्यक त्या खतांचा, अवजारांचा, जंतुनाशकांचा वेळेवर पुरवठा होणे हेही महत्त्वाचे आहे. आणि या साऱ्या गुंतवणुकीसाठी पैसा उपलब्ध होणे ही तर प्राथमिक गरज आहे.

नवीन शेतीविकास नीतिबाबत एक-दोन महत्त्वाच्या शंका आहेत. आपली अन्न-धान्याची गरज त्वरित भागवावी त्याकरिता उपलब्ध साधनसामग्रीतूनच जास्तीत जास्त उत्पादन काढण्याचा प्रयत्न व्हावा हे संयुक्तिक वाटते. मागील २० वर्षे सरकारने सर्वच शेतकऱ्यांना (बागाईत-जिराईत) सवलती देऊन उत्पादन वाढ-विण्याचा प्रयत्न केला, पण तो अपयशी ठरला. आपले शेतीउत्पादन दरवर्षी सुमारे २·२५ टक्केच वाढू शकले. त्यामुळे हा नवीन प्रयोग हाती घ्यावा लागला.

**हुशार मुलांनाच जास्त मार्गदर्शन करून शाळेचा रिझल्ट उत्तम लावण्याच्या प्रयत्नासारखेच हे आहे.**

अल्पमुदतीचा मार्ग म्हणून हे अपरिहार्य मानले तर प्रश्न असा उपस्थित होतो की जिराईत शेतीचे भवितव्य काय? महाराष्ट्रापुरते पाहिले तर जेमतेम १० टक्के जमीनही निश्चित पाणीपुरवठ्याखाली नाही. यासाठी एकतर जिराईत शेतीसाठी सुधारलेली बियाणे शोधावी लागतील वा जिराईत शेतीवरील लोकसंख्या अन्य क्षेत्रांत (व्यापार, उद्योग) हलवावी लागेल.

दुसरे म्हणजे पाणीपुरवठ्याच्या सध्याच्या सोयीत फार मोठी वाढ होणे असंभाव्य आहे. तेव्हा सध्या पाणीपुरवठ्याखाली ज्यांच्या जमिनी आहेत त्यांना अशी विशेष वागणूक मिळाली तर त्यांना अचानक लाभ होणार नाही काय? याचे ग्रामीण अर्थजीवनावर काय परिणाम होतील?

आणि विकासाचे तत्त्व म्हणून केवळ कार्यक्षम व प्रस्थापितांना संधी देण्याचे आपण मान्य केले आहे काय? तसे असेल तर औद्योगिक क्षेत्रात सर्व कारभार टाटांच्या हवाली करावा हे बरे.

काही दूरगामी महत्त्वाच्या शंकांचा उल्लेख मुद्दाम केला आहे; कारण कोणत्याही नव्या धोरणाच्या वा कार्यक्रमाच्या फार आहारी जाण्याची सरकारची सवय आहे. असे जरी असले तरी नवीन शेतीविकास नीती यशस्वी झाली व धान्य उत्पादन गरजेइतके होऊ शकले तर ते सध्यापुरते का होईना उपकारकच ठरेल.

**—चंद्रशेखर मराठे**

O

---

---

---

---

---

---

## शुभंकरोति — ऽऽ — शुभंकरोति

---

### विजय तेंडुलकर — लेखांक सहा

---

प्रत्यक्ष चित्रीकरणासाठी नटाने आपली मुख्य शक्ती राखून ठेवावी......असेच काहीतरी ते वाक्य होते. त्या वाक्याने जणू चित्रपटाच्या अभिनयाची गुरुकिल्लीच अभावितपणे आपल्या हाती देऊन टाकली. आपल्या अभिनयाची घडण इथून, आश्चर्य वाटावे अशी पालटत गेली, असे आता आठवते. चित्रीकरणापूर्वीच्या तालमींकडे आपण वेगळ्याच दृष्टीने पाहू लागलो. भावनांचे प्रकटीकरण आपण या तालमीत करीनाशा झालो. प्रकाश, ध्वनियोजना आणि कॅमेऱ्याची चौकट नि हालचाल एवढ्या गोष्टी या तालमीत हेरून आपल्या भावप्रकटीकरणाचे स्वरूप आपण मनोमन ठरवू लागलो. या तांत्रिक मर्यादांत जास्तीत जास्त काय करता येईल त्याचा अंदाज आपल्याला यामुळे नीट घेता येऊ लागला आणि प्रत्यक्ष चित्रीकरणात नेमके नि परिणामकारक भावप्रकटीकरण शक्य होऊ लागले. त्याला एक ताजेपणा, उत्स्फूर्तपणा येऊ लागला. कितीही ' रीटेक्स ' झाले तरी ' फायनल टेक 'साठी आपण ताज्यातवान्या राहू लागलो. थकण्याचा प्रश्नच आता उरेनासा झाला. थकलेच तर ते शरीर. मन पुरेसे टवटवीत असू लागले. ' रशेस ' पाहताना पूर्वीच्या आपण आणि नव्या आपण यांतला फरक पडदाच आपल्याला सांगू लागला. अभिनयात यांत्रिकपणा राहिला नव्हता; तरीही नेमकेपणा आणि हिशेबीपणा होता सेट्वर इतरांची चित्रीकरणे अभ्यासताना, स्वतः कॅमेऱ्यापुढे असताना, मनाशी

आपल्यापुरतें अभिनयाचे आणि त्याच्या पडद्यावरच्या परिणामांचे आडाखे अहर्निश चालत, ते मनोमन तपासून घेतले जात.

अभिनयासाठी आगाऊ ' मूड ' घेण्याचा उमेदवारीच्या काळातला एक प्रकार आता आपोआप संपला. लाइटस उजळले, कॅमेरा चालू लागला, की तेवढ्यापुरता जो हवा तो अभिनय हुकमी घडू लागला. दिव्याचे बटन कोणी दाबावे तसे हे घडे कसे ते कुणास ठाऊक.

पण याने एक नवाच गैरसमज निर्माण झाला आणि वाढलाही. बरोबरीचे नट-नटी म्हणू लागले, उषा लबाडी करते. तालमीत काहीच दाखवीत नाही आणि चित्रीकरणात सगळे करते. याने आमचा अभिनय पडतो. ती काय करणार याचा आगाऊ अंदाज आम्हांला ती मिळूच देत नाही. काही दिग्दर्शकदेखील कुरकुरत. म्हणत, नंतर सगळे करते म्हणता, त्याने तुम्ही काय करणार आहात याचाच पत्ता आम्हांला राहत नाही. तरीही आपल्या हाती आलेले आपल्या सोयीचे अभिनय-तंत्र आपण या कुणासाठी सोडण्याला राजी नव्हतो. तालमीत आपण हलक्या फुलक्या, निर्विकार आणि काही वेळा ' सीन ' गंभीर असूनही हसत खिदळत असायच्या. चिडाचीड होई. एक गुणी कॅरॅक्टर ॲक्टर म्हणे, तुम्ही मूड घेत नाही आणि आमचा घालवता. त्यांचा राग तसा रास्त असे; पण आपली उत्तम चित्रपट-अभिनयाची युक्ती आपण तरीही धरून राहिलो. कारण त्यानेच आपली हुकूमत चित्रपट तंत्रावर पक्की राहून भावप्रकटीकरण निर्वेधपणे आणि नेमके घडत असे. इतरांची दृश्ये ' खाणे ', त्यांना नामोहरम करणे, असले तर काही कधीही आपल्या मनात आले नाही. परंतु इतरांच्या मनातला हा संशय आणि ग्रह कधीही गेला नाही, हे तितकेच खरे.

अपवाद : अशोककुमार. गंमत म्हणजे आपले अभिनयतंत्र त्यांचेही होते असे बरोबरीने भूमिका करताना दिसून आले. खुद्द ' टेक ' मध्येही, भावप्रकटीकरणा-साठी प्रत्यक्ष कृतीऐवजी कृतीचा समाधानकारक आभास ते कॅमेऱ्याला देत. उदाहरणार्थ थोबाडीत मारणे. ते म्हणत, उषा, गालाला हातही न लावता हे करू. मी मारल्याचा आविर्भाव करीन, तू गालात बसल्याचा कर. हे प्रत्यक्ष थोबाडीत न मारता जमले पाहिजे, ' दादामणीं 'नी हे जमवून दाखवले. पडद्यावर ते दृश्य खूप खरे वाटले. प्रत्यक्ष चित्रीकरणातही ताकद बाकी राखून जास्तीत जास्त परिणाम साधणे ' दादामणीं 'कडून आपण शिकलो. बरोबरीच्या तुलनेने नवख्या कलाकाराला कसे वागवावे, त्याचे उत्तम ते कॅमेऱ्याला मिळाल्याने दृश्याचा परिणाम वाढून आपल्या अभिनयालाच कसा त्याचा उपयोग होतो, हे या ज्येष्ठ, सुसंस्कृत, समंजस आणि अत्यंत गुणी नटाने आपल्याला दाखवून दिले आणि आपण अभिनेत्री म्हणून आणखी संपन्न बनलो. दिलीपसारख्या मातबर नायकाने अभिनयातले आव्हान आपल्याला प्रतीत करून दिले. त्याच्याबरोबरचे एकेक दृश्य म्हणजे कसोटी वाटे



डेव्हीड । मीना कुमारी । भारतभूषण । उषाबाई । १९५४

त्यासाठी दरोबस्त आगाऊ तयारी आपण करीत असू. त्याचा अभिनय, अशोककुमारप्रमाणे, खालच्या पट्टीतला परंतु उत्कट असे. अमियांची दिग्दर्शक म्हणून जात याच संयमी, फिक्या रंगात गडद परिणाम साधण्याच्या पंथातली होती. याने पाहता पाहता आपण या पंथात पोचलो. या पंथाच्या झालो. आणि या नंतर गाठ पडली ती एका बंगालीच दिग्दर्शकाची, फणी मुजुमदारांची. त्यांच्या ' बादबान 'च्या आपण नायिका होतो. नायक होता देव आनंद. आपली भूमिका कोळणीची होती. चित्रीकरणासाठी कोळी वसतीवर जाणे घडे. कोळणींचा परिचय, सहवास घडे. त्याच आपले केस बांधीत, आपल्याला त्यांच्या पद्धतीने लुगडे नेसवीत. त्यांच्या चालीरीती, नाच दाखवीत. पुढे पुढे आपण एवढ्या त्यांच्यांतल्याच झालो, की वसईची ब्राह्मण मुलगी उषा जणू संपलीच. त्या आपल्यावर फार प्रेम करीत. हे प्रेम कालपरवांपर्यंत चालूच आहे. कधीमधी त्या घरी येतात. त्यांच्या घरी सणावारी आग्रहाने बोलवतात. ' बादबान ' या भाबड्या, प्रेमळ जातीत घालवलेल्या क्षणांसाठी कायमचे ध्यानात राहून गेले आहे. भूमिकेत आपल्याला सामावून घेताना फणीदांना विशेष

तकलीफ झाली नाही. आधीच्या मूर्तिकाराने–अमियांनी–मूर्ती घडवूनच ठेवली होती. फणीदांनी तिच्या संयमी अभिनयाचा, डौलदार बोलण्याचालण्याचा उपयोग करून घेतला. देव आनंद तेव्हा लोकप्रियतेच्या वाटेवर होता. आता एवढेच आठवते की आठवण्याजोगा एकही कलात्मक अनुभव त्याने आपल्याला सेटवर दिला नाही. तो देखणा होता, जरा जादाच देखणा होता; आणि तरतरीत होता–बस्स. एवढेच.

उषा पुसट उसासून टिपणे घेणाऱ्या समोरच्या पत्रकाराकडे पाहते. मनाशी म्हणते, हा नक्कीच म्हणत असेल, बाई स्वत: पडद्यावरून केव्हाच अंतर्धान पावली आणि अजून पडदा गाजवणाऱ्या तुफान लोकप्रिय देव आनंदवर टीका करते आहे! मत्सर, दुसरे काय ?

मनाशीच ती किंचित् हसते....

असे आरोप, गैरसमज पुष्कळ झाले....सतत झाले....अजून होतात....

पण मत्सर काय म्हणून ? आपल्याला आपल्या गुणांच्या तुलनेने पुष्कळ मिळाले. जवळ प्रथमदर्शनी डोळ्यांत भरणारे रूप नव्हते, तरीही नायिकेच्या भूमिकांपर्यंत पोचलो. दुय्यम आणि तिय्यम भूमिकांतच अनेकींची सारी उमेद सरते त्या तुलनेने हे केवढे यश ! पुढे बांधा हवा तेवढा प्रमाणबद्ध राहिला नाही, ज्यासाठी आपली निवड होई ते नृत्य अवश्य तितक्या चपळाईने, सुडौलपणे नाचता येणार नाही असे आपले आपल्याच वाटू लागले तेव्हा नृत्यप्रधान भूमिकांतून आपली बढती केवळ भावपूर्ण अशा प्रमुख भूमिकांत झाली आणि स्पर्धेत आपले स्थान आपण टिकवून धरले. लग्नानंतर घरसंसार सांभाळून ते आपण राखले. इतकेच नव्हे तर महिने गेले असताना आणि एकदा तर प्रसूतीनंतर अपुऱ्या काळात आपण सेटवर दिवस दिवस आणि रात्र रात्र चित्रीकरणे करू शकलो, एखादा अपवाद वगळता बरोबरीच्या सर्वांनी आपल्याला उत्तम सहकार्य देऊन सावरून घेतले आणि आपले स्थान आपण त्यातही सोडले नाही हे काय थोडे झाले ? त्यात जन्मभाषा हिंदी नव्हे. शिक्षण मर्यादित. स्वभाव हा असा त्या सृष्टीत गैरसमज निर्माण करणारा; आग्रही आणि स्वत:चे समाधान झाल्याविना दुसरा म्हणतो म्हणून काहीही न करणारा. दिग्दर्शकांना आपण अनेकवार डोकेदुखी दिल्या. बरोबरीच्या गुणी आणि अन्य नटांपुढे आपल्या विशिष्ट अभिनय-तंत्राने समस्या उभ्या केल्या. तरीही पैसा, नाव, यश यांतल्या कशाही बाबतींत आपल्याला काही कमी राहिले नाही. मोजकीच वर्षे का

होईना, चित्रपटसृष्टीतल्या नामवंत नायक नटांबरोबर कामे मिळाली. आपल्या दाराशी बड्या निर्मात्यांच्या गाड्या तिष्ठत होत्या. आपण म्हणू त्याच रकमेत करार केले जात होते. शाळेच्या स्पर्धेत 'मला मात्र गाढवच आवडते' पाठ म्हणून वाहवा घेणाऱ्या वसईच्या गावंढळ उषा मराठेला चित्रपटांच्या इंद्रपुरीत आणखी काय मिळायला हवे होते ?

नाही म्हटले तर एकच रुखरुख राहिली. त्या काळात मीनाकुमारी यशाच्या शिखरावर होती. आपल्या आणि तिच्या भूमिकांचा प्रकार सारखा असे. दर वेळी एखाद्या मातबर भूमिकेसाठी आपली दोघींची नावे घेतली जात. तुलना होई. परंतु अखेर निवड केली जाई ती मात्र तिची. ती उपलब्ध नसेल तेव्हा ती भूमिका आपल्याकडे येई. ही आपल्या यशाची हद्द राहिली. या खऱ्याखुऱ्या प्रथमश्रेणीला आपण पोहोचलोच नाही. तेवढे बाकी राहिले. इथूनच परत फिरणे आले. तरीही मीनाकुमारीसारख्या प्रभावी अभिनेत्रीचा मत्सर आपल्या मनाला शिवला नाही. राहिली ती कायम रुखरुख. स्पर्धेत दुसऱ्याच येणाऱ्या स्पर्धकाची रुखरुख. या रुखरुखीनेच आपण श्रमांची पराकाष्ठा केली. आपले उत्तम ते आपल्या भूमिकांना त्यांच्या मर्यादेत दिले. आपण हरलो त्या या मर्यादांपुढे, भूमिकांच्या साचेबंदपणापुढे, निर्जीवपणापुढे. काही वेळा दिग्दर्शकाच्या फार छोट्या वकूबापुढे आणि कल्पना दारिद्र्यापुढे.

तरीही हरलोच...सदैव दुसऱ्याच राहिलो...'बी' क्लास आर्टिस्ट...नेव्हर 'ए' क्लास...'ए' क्लास म्हणजे काय असते ते कळत असल्याने ही रुखरुख...ही पैशाने भरून निघणारी नव्हती, प्रसिद्धीने नव्हती . . .भरून निघाली फक्त एकाच गोष्टीने. . .

**मनाशीच उषा खुद्कन हसते. कशी कोणास ठाऊक पण नजर अभावितपणे भरल्या घरावरून फिरत असते. तिला वाटते की हे घर मनोहर नावाच्या एका जादूने भरले आहे....**

**पत्रकार हातच्या कागदातून बाहेर येऊन विचारतो, तुमची सर्वात आवडती भूमिका कोणती ?**

सौ. उषा मनोहर खेर हीच. फार अवघड. तरीही सर्वस्वाने करावीशी वाटत आलेली. सार्थकाचे साफल्य देणारी.

समोर एक घर आहे. त्यात माणसे पुष्कळ आहेत. पण वातावरण धर्मशाळेचे आहे. तिथे चित्रपटसृष्टीतला एक श्रेष्ठ कलावंत राहतो.

काही अंतरावर दुसरे आलिशान घर आहे. खोल्याच खोल्या. खूप सुखसोयी. भरपूर नोकरचाकर. गाड्या. पैशाला कमी नाही. तिथला मुख्य माणूसच निघून



। अद्वैत । उषाबाई । १९६० ।

गला आहे. त्याला तिथे विश्वास, प्रेम कधी मिळालेच नाही. त्यालाही ते देता आले नाही. प्रत्यही घडत ती युद्धे. हाणामाऱ्या. रातोरात दोघांतले कुणी तरी एक गाडी काढून निघून जाई. तारस्वरात शिवीगाळ घडे. मुले उपाशीच राहत. नोकराचाकरांत संस्कारहीन वाढत. एकदा संसारातल्या तिने झोपेच्या गोळ्या घेतल्या. ती जगली मग त्याने घेतल्या. तो गेला. मागे चित्रपटसृष्टीत आदराने घेतले जावे असे नाव ठेवून गेला. ते नाव आहे; पण बाकी ?

ज्यांना एकाच एका जोडीदाराचा विश्वास आणि आधार भेटलाच नाही अशा अनेक आहेत. . .आयुष्यात प्रेम वाढत, तडजोडीने जगत, घर नसलेले घर उरीपोटी सांभाळीत . .रुपेरी पडद्यावर यशस्वी, खऱ्याखुऱ्या, रक्तामांसाने जगण्याच्या आयुष्यात दुर्दैवी. . .एका ठिकाणी भक्ती टांगली आहे, शरीराचे दान दुसरीकडेच घडत आहे, वैभव तिसऱ्यालाच मिळत आहे. . .सारे आहे आणि काहीही नाही. . .काहीही नाही. . .

कल्पनेनेच उषाच्या पोटात क्षणभर गोळा उठतो. असे आयुष्य आपल्या वाटयाला आले असते तर ? तर ??

ती म्हणते, खरे म्हणजे साऱ्याच भूमिका मी मनापासून आणि श्रमांना मागेपुढे न पाहता केल्या. आज त्यातली एखादी गाजलेली पुन्हा पाहू लागले तर वाटते की मी कमी पडले. अजून तिच्यात मी काय करायला हवे होते तेच डोक्यात येत राहते. आज कोणतीही भूमिका समाधान देत नाही. अभिनयातले उत्तम ते आता कुठे कळू लागले आहे असे वाटते ...

पत्रकार अर्थपूर्णपणे उषाकडे पाहतो.

त्याला नजरेने म्हणायचे असते, हे आपले फॅशन म्हणून तुम्ही म्हणता आहात... याने लोकांना वाटते, काय बाई प्रांजळ आहे ...

उषाला हे समजते. तिला हसूच येत राहते. अभिनय भाबडेपणाने खरा समजतात आणि काही वेळा खरे ते चतुराईने अभिनय समजतात—त्याचेच नाव लोक असावे ...

उषाला हसूच येत राहते.

पत्रकार पुन्हा त्याच अविश्वासाच्या नजरेने कर्तव्याच्या गंभीर स्वरात नवा प्रश्न विचारून पाहत राहतो

रंगभूमी आणि चित्रपट यांत तुम्हांला अभिनेत्री म्हणून अधिक काय आवडते ?

अर्थात् चित्रपट. त्यासाठी क्षणाचाही विचार करण्याची गरज नाही. कॅमेरा म्हटला की, अंग कसे रोमांचित होते. सेट्वर प्रकाशाचे झोत अंगावर घेताना आनंदाच्या स्रोतात उभे असावे तसे होते. चित्रीकरणाला आरंभ झाल्याची क्लॅप पडते ती बाहेर नव्हे, आत-आत कुठेतरी; आणि चैतन्य जणू लौकिक आयुष्याचे बांध फोडून बाहेर येऊ लागते...कधी ते संयमाने झरत राहते तर कधी आवेगांच्या उद्रेकांनी ते उफाळत राहते. कडीकुलपांत बंद असलेल्या आपल्यातल्या आपण जणू मुक्त होत असतो, व्यक्त होत असतो. अस्तित्वाचा अणुरेणू मुक्तीच्या अनुभवाने

थरारत असतो...प्रत्यक्षच नव्हे, चित्रीकरणाच्या नुसत्या कल्पनेनेही हे अननुभूत सुख मनाने आपण घेऊ लागतो. कासावीस होतो.

रंगभूमीवर हे आपल्याला कधीच लाभले नाही. 'आशीर्वाद 'मधली चुणचुणीत परकरी उषा मराठे मो. ग. रांगणेकरांच्याच ' वहिनी 'मध्ये भारदस्त वहिनी म्हणून नऊवारी पातळात गतवर्षी रंगभूमीवर आली तरी रंगभूमीवर ती उपरीच होती आणि रंगभूमी तिला उपरी होती. समोरच्या गर्दीचे ओझे वाटते. तिच्या अनुकूल प्रतिक्रियाही अस्वस्थ करतात. सलग भूमिकेत अवघडलेपण येऊ लागते. प्रयोगाआधी तालमीत यांत्रिक आणि हसतखिदळत राहण्याचे आणि प्रत्यक्ष प्रयोगात समरस होण्याचे आपले तंत्र इथे फारच घोटाळे माजवते. बरोबरीचे नट वैतागतात. दिग्दर्शक रागावून म्हणतो, उषाबाई, प्रयोगाचे प्रयोगात. तुम्ही भूमिकेत काय करणार ते मला इथे तालमीत कळले पाहिजे. तालमीत तर तुम्ही काहीच करीत नाही ! भूमिकेचे बेअरिंग तुम्हांला जमत नाही. संवाद कोरडे वाटतात. रसभंग करणाऱ्या गोष्टी तुम्ही किती करीत असता ! प्रयोगात नको, आता इथे तालमीत तुम्ही काय करणार आहात, ते दाखवा !

शेवटी प्रयोगात यातल्या अनेक शंका आपोआप मिटतात आणि भूमिकेला न्याय मिळालेला या सर्वांना दिसतो, हे खरे; पण प्रयोगापर्यंत आपण त्यांना एका धास्तीत ठेवतो. सोयीने पत्करलेले तंत्र आता अंगीच मुरले आहे. आणि वारंवार पटते आहे की, आपले खरे काय ते तिथे—कॅमेऱ्यासमोरच.

चित्रीकरण संपले की, तेवढा चित्रपट हातावेगळा होतो. नाटक दर प्रयोगागणिक नव्याने जगावे लागते. दर प्रयोगागणिक ती आधी दिवसभर सुरू होणारी जीवाची घालमेल...ती रात्री अपरात्री ' नक्कल विसरली तर नाही ' या संशयाने पार उडणारी झोप...जांभया देणाऱ्या मनोहरना समोर बसवून मग अपरात्री चालणारी शाळकरी घोकंपट्टी...अन्नावरून उडालेली वासना...आणि क्वचित पहिल्या प्रयोगाआधीचा ताण फार झाला तर अंगावर नुसता फुलून येणारा ' रॅश ' ...

अजून आठवते. ' गारंबीचा बापू 'च्या प्रयोगाआधीचे दिवस... (क्रमशः)


क्र. ४१ मध्ये ६ बिनचूक विजेत्यांनी प्रत्येकी रु. ३,५०० जिंकले

लिट् क्विझ नं. ४३ मध्ये **रु. ४१,०००** जिंका.

रु. ४ च्या पावतीसोबत आकर्षक मोफत कॅलेन्डर भेट मिळवा.

प्रवेश-पत्रिका प्रत्येक रविवारच्या **नवशक्तीत** प्रसिद्ध होते.

१५ भाषेत १४० एजन्टस् २४० पत्रांत जाहिरात



# झोपडपट्टीत महाविद्यालयीन

प्रमोद सबनीस

" आपण येथे आलो आहोत, ते येथील लोकांवर उपकार करण्यासाठी नसून, या समाजाची सुखदुःखं समजून घेण्यासाठी, त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा म्हणून. "—नॅशनल कॉलेजचे प्रा. यशवंतराव केळकर भाषण करत असतात. तीन साडेतीनचा सुमार असतो. समोर बसलेल्या ' ऑक्टोबर–हीट 'ने ६०–७० विद्यार्थि–विद्यार्थिनींच्या लाल झालेल्या चेहऱ्यांवर निराळाच रंग चढत असतो. समोवार पसरलेल्या चिखलातून नक्की काय निर्माण करायचंय, ह्याचा बोध न झाल्यामुळे चेहरे प्रश्नांकित असतात. त्यानंतर कार्यप्रमुख सुहास उपासनी आठ दिवसांच्या एकंदर प्रकल्पाची माहिती सांगतो. ' हे आपल्या

## विद्यार्थी

हातून पूर्ण होऊ शकेल का ?' त्या शंकेनं एक दुसऱ्याकडे पाहत असतो. तेवढ्यात, ' उठा, राष्ट्रवीरहो, सज्ज व्हा, उठा चला, 'ची ललकार ऐकू येते. तितक्याच जोमानं तिला प्रतिसाद मिळतो. झोपड्याझोपड्यांतून चेहरे पटापट बाहेर डोकावतात. इतक्या जोराचा एकत्रित आवाज ऐकण्याची कानांना सवय नसते; परंतु आत, पत्र्याच्या शेडखाली जमलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात मात्र एकतेची भावना मूळ धरू लागते. मनातल्या मनातच प्रश्नाचं उत्तर मिळत जातं.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या मुंबई शाखेतर्फे गांधी जन्मशताब्दीच्या निमित्ताने दि. २९ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरपर्यंत झोपडपट्टीत जो शरीरश्रमाचा व शैक्षणिक सर्वेक्षणाचा कार्यक्रम झाला, त्याच्या उद्‌घाटनाचा हा प्रसंग.

रोज साडेतीन वाजता हे विद्यार्थी घाटकोपर येथील झोपडपट्टीत जमत. तत्पूर्वी,

सकाळी ८ वाजल्यापासून असलेल्या, विद्यार्थी परिषदेच्या नव्या–जुन्या कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष घरोघर भेटी देण्याच्या कार्यक्रमात हे विद्यार्थी सहभागी होत. झोपडपट्टीत जमल्यानंतर, प्रथम राष्ट्रीय प्रश्नांच्या संदर्भात वीस–पंचवीस मिनिटे मान्यवर व्यक्तींचे मार्गदर्शनपर भाषण होई. त्यात " यः क्रियावान् स पंडितः " या विषयावर डॉ. केशवराव केळकर बोलले. " सामाजिक प्रश्नांचे विद्यार्थ्यांना आव्हान " ह्या विषयी मुंबई विद्यापीठ सीनेट सदस्य श्री. पद्मनाभ आचार्य यांनी आपले विचार मांडले. विल्सन महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. आयरन् ह्यांनी " राष्ट्रीय एकात्मतेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोण " दाखवून दिला. तसेच ' विवेक 'चे संपादक श्री. राजाभाऊ नेने ह्यांनी ' ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या भारतातील कार्या 'चा आढावा घेतला. ह्या विचारांतून राष्ट्रीय आणि सामाजिक प्रश्न जागरूकतेनं हाताळण्यासाठी तरुण मनं घडत होती.

या कार्यक्रमानंतर कुदळ–फावडी घेऊन विद्यार्थी बाहेर पडत. कामाची तीन गटांत वाटणी होत असे. " हैय्या हो हैय्या "च्या गजरात घमेली उचलली जात. स्वतःच्याच हातावरील रेषा स्पष्ट न उमटलेली ही तरुण मनं एकदम मातीचं भविष्य ठरविण्यास सिद्ध होत होती. मोठ्या आत्मविश्वासानं दगडधोंडे बाजूस सारले जात. विशेष म्हणजे कुणीही बघेपणानं बाजूला उभा नव्हता. " स्वतःच्या इस्त्रीला सदैव जपणारे हेच का ते कॉलेज युवक–युवती ?" असा प्रश्न कुणाच्याही मनात उभा राहावा, असं ते सुंदर दृश्य होतं. विद्यार्थ्यांचा उत्साह बघून तेथील रहिवासीसुद्धा कार्यक्रमात सामील झाले होते.

७ दिवसांच्या ह्या कार्यक्रमात अगदी जवळून वाहणारा एक नाला बुजवून एक प्रशस्त मैदान तयार करण्यात आलं. त्याचप्रमाणे बुजवलेल्या नाल्याला थोडीशी लांबची वाट दाखवण्यात आली. तसेच ५०–६० फुटांचा एक रस्ता पक्का करण्यात आला. श्रमपरिहार म्हणून दररोज झोपडपट्टीतील रहिवाश्यांतर्फे कार्यकर्त्यांना चहा देण्यात येत असे. भावनिक ऐक्याचं मनोज्ञ दर्शन त्या चहात होतं होतं.

चहापानानंतर हे विद्यार्थी झोपडपट्टीतील शैक्षणिक सर्वेक्षणाच्या कार्यक्रमासाठी बाहेर पडत. ' वन् वे 'च असलेल्या छोट्या छोट्या बोळकांडींतून चार-चार विद्यार्थ्यांचा एक गट एखाद्या झोपडीस भेट देत असे. पापलेटच्या घमघमणाऱ्या वासानं त्यांचं स्वागत होत असे. खेळीमेळीच्या वातावरणात गप्पा चालत. जेवणाचासुद्धा आग्रह होई. गप्पा मारतामारता कार्यकर्ते शिक्षण-क्षेत्रांतील विविध प्रकारची माहिती त्या लोकांना देत होते, त्यांच्याबद्दलची माहिती मिळवीत होते. आमचे कार्यकर्ते तेथील लोकांना नुसतेच भेटत नव्हते, तर माणसातला 'माणूस' एकमेकांना सामोरा जात होता. तिथं नव्हती प्रश्नोत्तरांची कसरत, होत्या त्या चार शिळोप्याच्या गप्पा. मिळालेल्या माहितीतून तज्ज्ञ समाजशास्त्रज्ञ कोणताही निष्कर्ष काढोत, महत्त्व त्याला नाही तर समाजातील दोन तथाकथित थरांचं इथं जे एकत्रीकरण होत होतं त्याला.

म्हणूनच समारोपाच्या दिवशी तिथं एक सोहळा झाला. स्वतःच तयार केलेल्या मदानावर विद्यार्थी आणि तेथील रहिवासी यांची सभा झाली. प्रमुख पाहुणे म्हणून टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेसच्या संशोधन विभागाचे प्रमुख प्रा. एस्. डी. पुणेकर उपस्थित होते. त्यांनी आर्थिक आणि सामाजिक दृष्टिकोणांतून झोपड-पट्टीच्या प्रश्नांची चिकित्सा केली. परिषदेच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन करून पुणेकरांनी तेथील रहिवाश्यांना एक प्रेमाची सूचना केली की, " बाहेरील मदतीपेक्षा स्वावलंबन हाच खरा शहाणपणाचा मार्ग आहे. ही स्वच्छता ह्यापुढे तशीच राख-ण्याची जबाबदारी सर्वस्वी तुमची आहे. " सभेनंतरचा कार्यक्रम म्हणजे विद्यार्थ्यांना रहिवाश्यांनी दिलेलं भोजन !

उघड्या मैदानात शंभर-सव्वाशे पानं मांडली होती. त्रिपुरी पौर्णिमेच्या पिठुर चांदण्यात पंक्ती उठत होत्या. मसालेभाताचा वास सर्वांना अस्वस्थ करत होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीच्या नि आताच्या अस्वस्थेत जमीन-अस्मानाचा फरक होता. प्रा. पुणेकरही ह्यात मोठ्या आवडीनं सामील झाले होते. श्लोकांच्या फैरी झडत होत्या. रांगड्या आवाजांत तुकोबाचे अभंग आळवले जात होते. विद्यार्थी आणि रहिवासी एका अतूट नात्यानं बांधले जात होते. म्हणूनच की काय, सर्व कार्यक्रम संपल्यानंतर तेथील एका छोट्या मुलानं आमच्या एका कार्यकर्त्रीला विचारलं' " ताई, आता परत कधी येणार ? "

–कुणी सांगावं, ह्या ताईला नजीकच्या काळात परत येता येणं शक्यही होणार नव्हतं. परंतु एकमेकांच्या मनांत अशा भावना उत्पन्न व्हाव्यात ह्यातच ह्या उप-क्रमाचं यश होतं. अशा प्रकारे सकाळपासून संध्याकाळपर्यंत एखाद्या रचनात्मक कार्यात आजचा तरुण मग्न राहू शकतो ह्याचं हे प्रतीक होतं. ' वाराणशीतील 'ल चुकीच्या मार्गानं भरकटत असलेली तरुण मनं नीट दिशा दाखवली गेली तर घाटकोपरच्या झोपडपट्टीतही नवचैतन्य निर्माण करू शकतात. ○

स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

मी परका असल्यामुळे त्यांच्या खासगी भानगडीत पडणं मला योग्य वाटलं नाही. बँकेच्या एका परीक्षेसाठी मला मुंबईत येणं भाग पडलं होतं. मुंबईत एका मित्राच्या घरी उतरलो होतो· सात-आठ दिवसांत परतणार असल्याने त्यांच्या भांडणात ढवळाढवळ करून काहीच निष्पन्न होणार नव्हतं, म्हणून मी रात्री पुस्तक घेऊन स्वस्थ वाचीत बसायचो.

त्या चाळीतल्या दोन खोल्यांत माझा मित्र राहत होता. पैकी एक लहान खोली त्याने मला दिली होती. पण चाळ म्हटल्यावर सगळ्या गोष्टी आल्याच. एकाग्रता कुठून मिळणार ? पहिल्या मजल्यावर शांतता पसरल्यावर दुसऱ्या मजल्यावरील कुणा एका छोट्या साहित्यसंघाच्या सभासदांच्या गप्पा रंगात यायच्या; नाहीतर समोरच्या घरात महाभारताला

**लेखक । श्री. मोहन कल्पना**

सुरुवात होई.

समोरच्या घरात राहणारा तो गृहस्थ मध्यमवर्गीय असा. व तो एका खासगी ऑफिसात होता. ऑफिसातल्या कामामुळे तो रोज रात्री उशीरा घरी परतायचा; आल्याबरोबर धुडगूस घालायचा. क्षुल्लक कारणांसाठी नवराबायको भांडायचे. भाजीत तिखट कमीजास्त असलं तरी भांडण. भांडायला लागला, की तो खूप मोठमोठ्याने ओरडायचा.

गेल्या रात्री त्याने भांडी दूरवर फेकून दिली. तो चवताळून म्हणाला, " मी माणूस आहे की कुत्रा ? हे खापराचे तुकडे माझ्या घशातून कसे आत जातील ? एरव्ही त्याची बायको सहसा ओरडत नसे. उलट हात जोडून त्याला हळू बोलण्यासाठी विनवीत असे. पण गेल्या रात्री तीही ओरडली, " तुम्हांला

**अनुवादक । लछमन हर्दवाणी**



# खडकाचा शत्रू...

तर भांडायला फक्त एखादं कारण हवं असतं. बाजरीची भाकरी आवडत नाही तुम्हांला ?"

" मला तर विषदेखील आवडतं; दे ना आणून. " तो जळफळत म्हणाला.

यावर ती काहीच बोलली नाही. किंचित्‌काळ दोघंही गप्प राहिली. जराशानं ती म्हणाली—

" कोणतं दुःख आहे तुम्हांला ? मला सांगातर खरं. अहो, आपल्या मुलाकडे लक्ष द्या जरा. सातवीत दोनदा नापास झालाय्. त्याच्या भविष्याचा विचार करायला नको का ? घरी पैसा कमी येतो, कबूल. पण रोजरोज भांडून बाजारातील भाव कमी होतील असं वाटतं तुम्हांला ?"

त्याच्या मस्तकात एकदम तिडीक उठली—

" सगळा दोष माझाच आहे. तो नालायक दोनदा नापास झाला ना, ते माझ्यामुळेच. भाजीत मीठ कमी पडलं हा माझा दोष. महागाई वाढलीय् ना ? ती माझ्यामुळेच. कितीतरी अपराध केलेत मी आजवर. लग्न केलं हा पहिला अपराध, वेगळा झालो हा दुसरा अपराध आणि त्यानंतर तर नुसते अपराधच करीत आलोय् मी. ऑफिसात बारा-बारा तास बसून मरेमरेतो काम करावं आणि सालं घरी आल्यावर........."

असं म्हणत तो दार आपटीत तरातरा बाहेर निघून गेला होता. सुमारे अर्ध्या—पाऊण तासाने तो परतला होता.

पण त्याच्याकडे पाहून मी स्तंभित झालो. तो पार बदलला होता. त्याचा सारा राग वितळला होता. आता तर तो खूप गोड गोड बोलत होता. बायकोशी प्रेमाने वागत होता. मुलाला झोपेतून उठवून त्याला त्याने एक रुपयाची नोट दिली. तो मनसोक्त हसत होता.



त्या वेळेस मी बाहेर अभ्यास करीत होतो. मी पुस्तक बाजूला ठेवलं. अर्ध्या-पाऊण तासात या गृहस्थाच्या जीवनात एवढं काय घडलं की तो पार बदलला ! एवढा आनंद, एवढा उत्साह !

पण ते सर्व जाणून घेण्यासाठी मला मार्ग सुचला नाही. मी तिकडे दुर्लक्ष करून अभ्यासात मग्न झालो.

पण दुसऱ्या रात्रीही तेच घडलं. तिसऱ्या रात्रीदेखील तोच प्रकार. आधी बायकोशी कडाक्याचं भांडण, मग तो गृहस्थ घराबाहेर पडायचा. परतल्यावर तो खूप उत्साही वाटायचा. लहान मुलाला कडेवर घेऊन अक्षरशः नाचायचा, घोडाघोडा खेळू लागायचा. भाजीत खरोखरच मीठ कमी टाकल्यामुळे बायकोने माफी मागताच तो हसत म्हणायचा—' छे ग, मीठ तर बरोबर होतं ! ' आज मी हेदेखील पाहिलं की, तो नेहमीपेक्षा आज उशीराच परतला होता.

मी बेचैन झालो. असं कसं घडलं ? तो तर दारूही पीत नसे. मग भांडणानंतर अर्ध्या पाऊण तासात काय घडलं असावं एवढं ? कुठे जात असावा तो ?

त्या रात्री त्या गृहस्थाच्या घरी एक इसम आला. माझ्या बँकेच्या हेड ऑफिसात होता. तो बाहेर पडताच कोपऱ्याजवळील पानपट्टीच्या दुकानाजवळच मी त्याला गाठलं, तो खुशीत दिसत होता. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मी म्हणालो—

" आज फार खुषीत ? काही विशेष ? "

तो एखाद्या तत्त्वज्ञानी माणसाप्रमाणे म्हणाला— " हो ना. माझा हा आनंद दुसऱ्याची देणगी आहे. आज एका दुःखी मित्राला आनंदात पाहून खूष झालोय् मी."

" कोणता मित्र ? "

" वर राहतो तो. त्याच्याकडूनच आलो मी. "

" हंऽ "—मी पुटपुटलो. जराशानं विचारलं—

" तुमचा मित्र खरंच का दुःखी होता ? "

" हो ना. अहो, तो नोकरीला असतो एका शेटजीकडे. त्याचा शेटजी म्हणजे महाभयंकर. अगदी हलकट. दिवसभर माझ्या मित्राला छळत असतो. शिव्या काय, अपमान काय. काही विचारू नका. त्याच्या प्रत्येक कामातून चुका काढीत असतो. स्वतःची चूक असूनही अपराधी माझा मित्रच. त्या दिवशी शेटजीने त्याला एक फोन नंबर देऊन फोन करायला सांगितलं. पण ' रॉंग नंबर ' मिळाल्यावर पंचवीस पैसे माझ्या मित्राकडूनच भरून घेतले ! आता बोला. "

मी हसून म्हणालो—" आणि आता तुमच्या मित्राचा तो शेटजी मेलाय् वाटतं! '

" छे हो. "

" मग...मग शेटजींचा स्वभाव बदलला असेल. "

" ते तर सुतराम शक्य नाही. "—तो हसू लागला.

" मग तुमच्या मित्राची अचानक दुःखातून सुटका व्हायला असं काय घडल

दुसरं ? "

" घडलंय् असं काही तरी. माणसाच्या स्वभावात शिरून त्याचा अंत पाहू नये हेच चांगलं. –" तो मिस्किलपणे हसत म्हणाला.

त्याचं उत्तर मला चमत्कारिक वाटलं.

" बराय्. येतो मी."– असं म्हणत तो झपाट्याने निघून गेला. मी पाहतच राहिलो.

आणखी दोन रात्री मी तेच दृश्य पाहिलं. एका रात्री मी पुस्तकं घेऊन जवळच्या स्टेशनवर जाऊन बसलो. थोड्याच वेळात तो गृहस्थ गाडीतून खाली उतरला. त्याच्या चेहऱ्याकडे पाहून मी थक्क झालो. तो भयंकर हवालदील दिसत होता. त्याच्या कपाळावर आठ्यांचं जाळं पसरलं होतं. तो रागावलेलाही दिसत होता.

तो चालू लागताच मी त्याचा मागोवा घेतला. तो आपल्या घराकडे न जाता एका बोळीत शिरला. त्या बोळीत वेश्यांची घरं होती. मी एकदम थांबलो. क्षणभर त्या गृहस्थाविषयी माझ्या मनात तिरस्काराची लाट उसळली. पण–पण नाही. तो तेथे थांबला नाही. तो सरळ पुढे जात होता. ती घाणेरडी वस्ती ओलांडून तो पलीकडे गेला. रस्त्यावर शुकशुकाट होता. मनाचा हिय्या करून मी त्याच्या मागोमाग जाऊ लागलो.

दूरवर रस्त्याच्या पलीकडे एक लहानशी टेकडी होती. त्या टेकडीवर जवळजवळ अंधारच होता. तो टेकडीवर चढू लागला. मीही टेकडीवरच्या एका मोठ्या खडकामागे लपून उभा राहिलो.

इतक्यात तो कोणाला तरी चेकाळून म्हणाला–


" हरामखोर......पाजी......साला तू माणसाच्या वेषात कुत्रा आहेस...... यू आर अ पिग......तू हलकट आहेस......साला तू नीच......थू : ...... "

तो धापा टाकू लागला. त्याने खिशातून रुमाल काढून घाम पुसला. मंद प्रकाशात मी पाहिलं–त्याच्या चेहऱ्यावर नवीन उत्साह संचारत होता. आता तो तितकासा बेचैन दिसत नव्हता. त्याने वर आकाशाकडे पाहून एक दीर्घ निःश्वास सोडला. आणि मग तो खिशात हात घालून एक सिनेगीत गुणगुणत परत जाऊ लागला. आता त्यात नवीन चैतन्य संचारलं होतं.

तो दूर गेल्यावर मी त्या जागेवर आलो. पण त्या ठिकाणी तर कुणीच नव्हता. मग ह्या शिव्या ? मी क्षणभर स्तंभित झालो. जराशानं मी काड्याची पेटी काढून काडी पेटविली.

मी चपापलो. त्या प्रकाशात मी पाहिलं–समोरच एक मोठा खडक होता आणि त्या खडकावर कोळशाने त्याच्या शेटजीचं नाव लिहिलेलं होतं ! ○

# फॉस्फोमिन - अधिक उत्साह देते. भूक वाढविते. जोम वृद्धिंगत करते. शरीराची रोग-प्रतिकार-क्षमता वाढविते.







खरोखर!...
फॉस्फोमिन म्हणजे
घरकुलांतील
आरोग्याचे कारंजे!




व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटस्युक्त उत्तम फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB® ®

® हा ई. आर. स्क्विब ॲण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

Shilpi SC 50 A/67 Mar

# पुस्तके

लोकशाही व समाजवाद हे शब्द आता इतके प्रचारात आले आहेत की, या कल्पनांचा खरा अर्थ समजून घेण्याची आवश्यकता आता कोणासच वाटत नाही. एका अर्थाने हेही या कल्पनांचे यशच म्हणावयास पाहिजे; पण आपल्या खंडप्राय देशामध्ये पसरलेल्या कोटयवधी मतदारांना 'लोकशाही' या विषयाचे प्राथमिक ज्ञान होणे आवश्यक आहे हेही तितकेच खरे आहे. या दृष्टीने प्राचार्य मा. पं. मंगुडकर यांचे अलीकडे प्रसिद्ध झालेले 'भारतीय लोकशाही—काही विचार' हे पुस्तक उपयुक्त आहे.

सुमारे शंभर पानांच्या या पुस्तकात 'लोकशाही' या विषयाची निरनिराळ्या दृष्टिकोणांवर व पातळ्यांवर सांगोपांग चर्चा केली आहे. लोकशाहीविषयीच्या काहीशा भाविक अशा दृष्टिकोणाचा प्रत्यय यामधील लिखाणात वारंवार येतो. भाषा अतिशय सुबोध आणि मृदू आहे. विवेचनाचे टप्पे पाडले असल्याने व मुद्देसूद अशा विवेचनामुळे विषय समजण्यासही सोपा झाला आहे. नव्याने सुशिक्षित झालेल्या व मताधिकार प्राप्त झालेल्या अशा अनेक लाखो तरुण-तरुणींनी हे पुस्तक जरूर वाचले पाहिजे. या पुस्तकाच्या वाचनाने वाचकाच्या मनात आपल्या देशातील राजकीय परिस्थितीकडे व सार्वजनिक जीवनाकडे पाहण्याचा नवाच निरोगी दृष्टिकोण निर्माण होईल. अल्पकालीन व दैनंदिन अशा अडचणींनी काहीसे ग्रस्त झालेले जनमन थोडेफार समजूतदार व शांत करण्याचे सामर्थ्य या पुस्तकात निश्चितपणे आहे. प्राचार्य मा. पं. मंगुडकरांचे मनःपूर्वक अभिनंदन !

चंद्रशेखर मराठे

# भारतीय लोकशाही – काही विचार

लोकशाहीविषयी मूलभूतपणे नवा असा सिद्धांत मांडणे वा लोकशाहीस नवीन समर्थन प्राप्त करून देणे, असा महत्त्वाकांक्षी हेतू या पुस्तकाचा नाहीच. आणि व्याख्यानाच्या माध्यमाने अवतरलेले कोणतेही विवेचन (या विषयांवरील लेखकाच्या दोन व्याख्यानांवर या पुस्तकातील विवेचन आधारित आहे.) असा मूलभूत प्रयत्न करू शकत नाही, त्यामुळे यापुढील मजकूर म्हणजे लेखकाच्या भूमिकेचा प्रतिवाद आहे असे मानण्याचे काही कारण नाही. या पुस्तकाच्या वाचनाने स्फुरलेले काही विचार एवढेच त्याचे स्वरूप समजावे.

"मानवी स्वातंत्र्याबरोबर मानवी समता हाही लोकशाहीचा कणा आहे," (पान २३) हे या पुस्तकातील वाक्य या सर्व पुस्तकाचे सार म्हणून सांगता येईल. मानवी स्वातंत्र्य व मानवी समता ही लोकशाहीची दोन व्यवच्छेदक लक्षणे आहेत असे मानले तर या दोन लक्षणांची आणखी थोडी तपासणी करावयास पाहिजे. पहिला प्रश्न स्वातंत्र्याचा घेऊ. राष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर स्वातंत्र्याचा अर्थ कोणत्याही परकी राष्ट्राच्या नियंत्रणाचा अभाव अशी स्वातंत्र्याची व्याख्या होऊ शकेल. हे स्वातंत्र्य टिकवावयाचे तर लोकशाही आवश्यक आहे. लोकशाही-विना ते टिकणार नाही असे म्हणता येत नाही. लोकशाहीखेरीज इतर अनेक राज्य-पद्धती वापरीत असलेली अनेक राष्ट्रेही आज स्वतंत्र आहेत. त्याचे श्रेय जगातील दोन सत्तागटांच्या सत्तासमतोलास जाते हे विसरता येत नाही. अणुशक्तीच्या उद्भवानंतर राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे परिमाण थोडे खाली आले आहे, हे नाकारण्यात अर्थ नाही. खऱ्या अर्थाने राष्ट्रीय स्वातंत्र्य टिकवावयाचे असेल तर अणुसज्ज व्हावयास पाहिजे एवढीच आजची आवश्यकता आहे. अणुसज्जतेसाठी लोकशाहीची आवश्यकता असेल किंवा नसेल म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्यापुरते तरी लोकशाहीस 'प्राणभूत' महत्त्व नाही हे कबूल करावे लागते.

राष्ट्रांतर्गत 'स्वातंत्र्य' ही कल्पना लावावयाची म्हटली तर राजकीय सोडून इतर सर्व (धार्मिक, सामाजिक, भाषण, विचार वगैरे) बाबतींतच ती लावावी लागते. अंतर्गत कारभारात राजकीय दृष्ट्या स्वातंत्र्याची कल्पना लागू करणे शक्य

नाही. मग या संदर्भात 'स्वातंत्र्य' या कल्पनेचा अर्थ काय ? हा अर्थ थोडक्यात घटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांसारखा आहे. व्यवसाय स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, भाषण व विचार स्वातंत्र्य, मालमत्ता धारण करण्याचे स्वातंत्र्य वगैरे. यांपैकी कोणतेही स्वातंत्र्य अनिर्बंध वा निरपेक्ष नाही. देशाच्या कायदेकानूंच्या चौकटीत (लॉ ऑफ् द् लँड) राहूनचं हे स्वातंत्र्य उपभोगावे लागते.

या विविध स्वातंत्र्यांची अशी चमत्कारिक अवस्था आहे की, ही निर्बंध राहावीत यासाठी सरकारला नित्य नवीन 'बंधने' घालावी लागतात. एका दिशेने स्वातंत्र्याचा विस्तार झाला, की दुसऱ्या दिशेने संकोच करावा लागतो. उदाहरणार्थ, प्रत्येकास अन्न-वस्त्र-निवारा मिळण्याचे स्वातंत्र्य (वा हक्क) आहे असे म्हटले तर प्रत्येकास आपणांस किती अपत्ये असावीत हे ठरविण्याचे स्वातंत्र्य देता येणार नाही. आज याबाबतचे 'निर्बंध' ऐच्छिक आहेत. कारण 'अन्न-वस्त्र-निवाऱ्याचे' स्वातंत्र्यही निरपेक्ष नाही. उद्या जर कायद्यान्वये एखाद्या भिकाऱ्याला सरकारवर या सर्व गरजां-साठी दावा लावण्याचा हक्क प्राप्त झाला तर ही ऐच्छिकता नष्ट होईल, यात शंका नाही.

## नैसर्गिक स्थिती

सारांश, 'व्यक्तिस्वातंत्र्य' हा लोकशाहीचा कणा आहे, हे विधान टिकणारे नाही. लोकशाहीचा दुसरा कणा जी 'समता' तिची तर याहूनही शोचनीय अवस्था आहे; कारण 'व्यक्तिस्वातंत्र्य' या शब्दातच 'इतरांहून विषम असण्याचे स्वातंत्र्य' असा (आणि एवढाच) अर्थ समाविष्ट आहे. सर्वांनी जर सारखीच मालमत्ता धारण करावयाची, सारखाच विचार करावयाचा, सारखेच जीवन जगावयाचे तर व्यक्तीला स्वतःचे असे स्वातंत्र्य कोणते राहणार ? तेव्हा व्यक्तिस्वातंत्र्याचा खराखुरा अर्थ प्रत्येक व्यक्तीस इतरांपेक्षा 'वेगळे' (विषम) होण्याचा हक्क आहे हाच आहे.

लोकशाहीमध्ये अभिप्रेत असलेल्या 'समते'चा अर्थ लक्षात घेतला तर हा मुद्दा अधिक स्पष्ट होतो. प्राचार्य मंगुडकर म्हणतात, "समता म्हणजे संधीची समता होय." (पान २३) संधी कसली तर इतरांहून अधिक पैसा मिळविण्याची, अधिक मालमत्ता धारण करण्याची, अधिक सत्ता गाजविण्याची वगैरे वगैरे ! म्हणजे विषमता हा जगाचा स्थायीभाव आहे हे गृहितकृत्य लोकशाहीतही उपस्थित आहेच. विषमता राहणार पण गरिबांना श्रीमंत होण्याची संधी मिळेल, कोणालाही सत्ता-धारी होण्याची संधी मिळेल एवढेच लोकशाही म्हणते. 'विषमता' ही नैसर्गिक स्थिती आहे हे स्वातंत्र्य व समता हे लोकशाहीचे दोन्ही कणे मान्य करतात.

खरे म्हणजे यात अघटित वा अनिष्ट असे काही नाही. अगदी मूलभूतपणे स्वातंत्र्य व समता या दोहोंशीही लोकशाही या कल्पनेचा संबंध नाही; किंबहुना राज्य (स्टेट) व सरकार यांचाही या दोन कल्पनांशी काडीचाही संबंध नाही. सरकार

(वा पूर्वी राजा) ही संस्था कशी अस्तित्वात आली याचा जरा विचार केला तर हे लक्षात येईल. इतिहासाच्या प्रभातकाली ज्यांच्याजवळ काही मालमत्ता वा गमावण्यासारखे काही होते त्यांनी आपल्या संरक्षणासाठी इतरांवर बंधने घालण्याकरिता 'सरकार' या संस्थेस जन्म दिला व या संरक्षणापोटी जी बंधने स्वतःस स्वीकारावी लागली ती स्वीकारली. विषमता टिकवण्यासाठी ज्या बंधनाचा जन्म त्याला आज आपण समता आणि स्वातंत्र्य यांचे अधिष्ठान समजतो. हा काळाचा महिमा होय.

समाजातील व्यक्तींना बंधने घालण्यासाठी ज्या मोठ्या बंधनाचा जन्म झाला त्या सरकारलाच पुढे काही बंधने घालण्याची जरुरी उत्पन्न झाली आणि म्हणूनच लोकशाहीचा जन्म झाला. जे आमच्यावर राज्य करणार ते आम्हांला जबाबदार असावेत (अकौंटेबल) एवढाच लोकशाहीचा ऐतिहासिक व तात्त्विक अर्थ आहे. काळाचाच महिमा असा की, आपली परिस्थिती शाबूत राहावी म्हणून मालमत्ताधारकांनी जन्माला घातलेल्या सरकारला व त्यांनीच लोकशाहीचे बंधन घातलेल्या सरकारला आज लोकशाहीमुळेच श्रीमंतांवर जास्त बंधने लादावी लागत आहेत. याच प्रक्रियेतून समाजवादाचे तत्त्वज्ञान उभे राहिले. 'एका व्यक्तीस एक मत,' असे एकदा ठरल्यानंतर व्यक्तीच्या संख्येस महत्त्व प्राप्त झाले व गरीब व्यक्ती साहजिकच जास्त असल्याने लोकशाहीचे रूपांतर समाजवादात झाले.

समाजवादाच्या कल्पनेचे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे परस्परसंबंध एवढे स्पष्ट आहेत की, लोकशाही समाजवाद हा स्वातंत्र्य व समता यांचे अधिष्ठान आहे हे म्हणणे टिकणारे नाही. जर समाजवादाच्या उद्दिष्टांप्रमाणे प्रत्येकास जीवनावश्यक गरजा भागण्याचे स्वातंत्र्य हवे असेल तर त्या पोटी देणारी सर्व बंधने स्वीकारली पाहिजेत व ही बंधने पूर्वीच्या धार्मिक, सामाजिक बंधनांपेक्षा कमी तीव्र व कमी व्यापक आहेत असे मानण्याचे कारण नाही. निरपेक्ष स्वातंत्र्य ही केवळ कविकल्पना आहे, निवड करावयाची ती बंधनांच्या विविध पर्यायांतच हे रोखठोक सत्य प्राचार्य मंगुडकर यांनी मांडले असते तर पुस्तकाची उपयुक्तता अधिकच वाढली असती.

आता थोडेसे भारतीय लोकशाहीबद्दल! भारतीय लोकशाही ही भारतीय जनतेने स्वीकारली नसून ती तिच्यावर ब्रिटिश लोकशाहीचे संस्कार झालेल्या भारतीय पुढाऱ्यांनी लादली आहे आणि या पुढाऱ्यांना हे पुढारीपण भारतात लोकशाही आणण्याकरिता नव्हे तर ब्रिटिशांना येथून बाहेर काढण्याकरिता मिळाले होते, हे लक्षात घेतले तर या दोन गोष्टींचे ऐतिहासिक कलम कसे झाले याचा अचंबा वाटू लागतो. सांसदीय लोकशाही सर्वसाधारण भारतीयाने स्वीकारलेली नाही असे म्हणण्याचे कारण असे की, तशी ऐतिहासिक परिस्थितीच इथे उद्भवली नाही. ब्रिटनमध्ये काय वा फ्रान्समध्ये काय किंवा अमेरिकेत काय तेथील जनजीवन जेव्हा अशा एका पातळीवर आले की, त्या वेळी सरकारविषयीच्या जनतेच्या अपेक्षा

दृढ व स्पष्ट झाल्या होत्या. तेव्हाच तेथे लोकशाहीचा अवतार झाला. सत्ताधाऱ्यांना जबाबदार बनविल्याशिवाय या अपेक्षा पुऱ्या होणार नाहीत असे दिसले तेव्हाच तेथे प्रातिनिधिक लोकशाही आली. भारतात १९४७ साली ब्रिटिश जाऊन जेव्हा काँग्रेसने जेव्हा अधिकारसूत्रे घेतली तेव्हाच आता आपले सरकार आले. हे आपणांस जबाबदार राहीलच, अशी सामान्य भारतीयाची भावना होऊन गेली. नेहरू-पटेल यांनी केवळ आपले काही सहकारी घेऊन तसाच राज्यकारभार सुरू केला असता तरी भारतीय जनतेने त्याचे स्वागतच केले असते.

आपले सरकार (स्वदेशी आहे एवढ्या अर्थाने) प्रातिनिधिक असूनही आपल्या अपेक्षा पुऱ्या होत नाहीत हे भारतीय जनतेचे वैफल्य वाढत आहे व या वैफल्यापोटीच प्रातिनिधिक लोकशाहीची निष्प्रभता जनतेस जाणवू लागली आहे, या सत्याचा आलेख प्राचार्यांनी स्पष्टपणे का केला नाही याचे आश्चर्य वाटते. ब्रिटिश जाऊन आपले राज्यकर्ते आले, वीस वर्षे झाली तरी आपण आहोत तेथेच आहोत ही जी भावना निर्माण होत आहे. तिचा लोकशाहीच्या कार्यवाहीस मोठाच धोका आहे आणि हा धोका गैरसमजुतीतून निर्माण झाला आहे. आपल्या राज्यकर्त्यांविषयींच्या असंतोष नकळत 'प्रातिनिधिक राज्यकर्ते' यांच्याविषयीही संक्रमित होत आहे. ही प्रक्रिया लोकशाहीस उपकारक नाही.

भारतातील लोकशाहीच्या यशाच्या दृष्टीने जी पहिली आवश्यक गोष्ट असेल ती ही की आपले (व प्रातिनिधिक) राज्यकर्ते असले तरीही या देशाची स्थिती आणखी काही दशके तरी सुधारू शकणार नाही; पण तरीही प्रातिनिधिक सरकारची आवश्यकता आहे हे सत्य सामान्य भारतीयास जाणवून देण्याची गरज आहे. लोकांनी निवडलेले सरकार असले तरी त्यालाही लोकांवर काही बंधने घालावी लागतात व लोकांनी ती पाळावी लागतात, हे निर्मळ सत्य आज कोणताही नेता अनुयायांना सांगत नाही. त्यामुळे येथील लोकशाही व समाजवाद या दोहोंना 'खास' भारतीय अर्थ प्राप्त झाला आहे.

## उत्साहाचा अतिरेक

खेदाची गोष्ट ही की, भारतीय लोकशाहीवाद्यांच्या अतिरेकी व भावुक उत्साहामुळेच येथील लोकशाहीची पाळेमुळे उखणली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. सरकारला कोणत्याही व प्रत्येक कारणावर विरोध करणे हे विरोधी पक्षांचे वर्तन व सरकारचे सर्वतोपरी समर्थन हे सत्ताधारी पक्षांचे वर्तन यांमुळे जनजीवनाच्या विविध अंगांमध्ये न भूतो असा गोंधळ उडत असल्याचे दिसते. हा गोंधळ जेवढा वाढत जाईल तेवढी जनमानसात सरकारबद्दलच नव्हे तर प्रातिनिधिक लोकशाहीबद्दलही अढी निर्माण होईल. सांसदीय लोकशाहीचे आधारस्तंभ जे राजकीय पक्ष त्यांच्याबद्दल जनसामान्यांची आज काय भावना झाली आहे, हे पाहिले तर वरील विधानाची सत्यता पडेल.

आमच्या भारतीय उत्साहाला अनुसरून येथे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत लोकशाही आणण्याचा बालिश प्रयत्न होत आहे. खरे म्हणजे राजकारण काय वा अन्य क्षेत्रे काय, तेथे 'नियमाधीन सत्ता' हेच सर्वोच्च अधिष्ठान असते. मात्र राजकारणातील प्रतिनिधित्वाचे तत्त्व अन्य क्षेत्रांत लावण्याचा प्रयत्न अयशस्वीच होणार; कारण विज्ञानाची प्रगती व संघटनात्मक सूत्रचालनाचा विस्तार यांमुळे जीवनातील अधिकाधिक क्षेत्रे विशेषज्ञांच्या अखत्याराखाली जात आहेत. डॉक्टर, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, हे त्यांच्या क्षेत्रांतील हुकूमशहाच असतात. तंत्रज्ञांची ही हुकूमशाही (टेक्नोक्रसी) लोकशाहीच्या सुरळीत निर्वाहासाठी अत्यावश्यक आहे, हे सर्व प्रागतिक देशांनी मान्य केले आहे. आमच्याकडे मात्र सर्व क्षेत्रांत लोकशाहीचे कलम (रूढ भाषेत राजकारण) केले जात आहे. असा लोकशाहीचा विस्तार होत राहिला तर एक दिवस त्यात राजकीय, सांसदीय लोकशाहीचा बळी पडेल असा धोका आहे.

लोकशाहीचे स्वरूप राजकीय क्षेत्रापुरते मर्यादित ठेवणे, जनसामान्याला लोकशाही राज्यव्यवस्थेचे खरे स्वरूप समजावून देणे व आर्थिक विकासाचा प्रश्न, लोकशाही समाजवादाच्या संदर्भातून काढून, उपलब्ध साधनसामग्रीच्या संदर्भात हाताळणे ही पथ्ये पाळली तर भारतीय लोकशाहीचे भवितव्य फार चिंताजनक नाही. यातील प्रत्येक गोष्टीसाठी भारतातील वर्तमानकालीन घटनाप्रवाह ऐतिहासिक पार्श्वभूमीवर व विस्तृत संदर्भात अभ्यासले जाणे ही पहिली गरज आहे. ही गरज अंशतः भागविण्याचे काम प्राचार्य मंगुडकरांच्या पुस्तकाने निश्चितपणे केले आहे. ○

**[भारतीय लोकशाही – काही विचार : मा. पं. मंगुडकर<br>नागपूर प्रकाशन, नागपूर : मूल्य साडेपाच रुपये]**


# पुरंदऱ्यांची नौबत

**ब. मो. पुरंदरे**

मूल्य साडेतीन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २




# दुसरे महायुद्ध कधी संपले ?

अनंत भावे

**१९४५.** अमेरिकनांच्या प्रचंड प्रतिकारापुढे नमून जपानी सैन्याची सतत पीछेहाट चालली होती. मिन्दोरो बेटावर लढत असलेली आमची तुकडीदेखील अमेरिकनांच्या भीषण हल्ल्याला तोंड देता देता जेरीस आली होती. त्या हल्ल्यातून आम्ही सुरक्षित राहिलो हेच मोठे आश्चर्य मानायास पाहिजे. त्यानंतर अकरा वर्षे उपासमार, रोगराई आणि एकाकीपण यांच्याशी झुंजत मिन्दोरो बेटाच्या एका अज्ञात कोपऱ्यात आम्ही काढली.

अकरा वर्षे माझ्या सहकाऱ्यांना मी सतत युद्धसज्ज ठेवले होते. पुढील आठवड्यात, दुसऱ्या दिवशी किंवा कदाचित आताच अंतिम हल्ला होईल की काय, असे आम्हांला सारखे वाटत होते. अमेरिकन सैनिक आणि फिलिपिनो गनिमी

अत्यंत काळजीपूर्वक पुन्हा पुन्हा ते पत्र मी वाचले. माझा विश्वासच बसेना. पत्र बनावट आहे की काय अशी शंका येऊ लागली. पण....
पण ते पत्र बनावट नव्हते. जपानने शरणागती पत्करली होती.........

यांनी आम्हांला चिरडून टाकण्याचा निश्चय केला आहे, अशी आमची खात्रीच झाली होती.

जपानी सैनिक कधीही शरणागती पत्करीत नाहीत. आम्ही लांच्छनास्पद मानतो ते. त्यामुळे संभाव्य हल्ल्याच्या प्रतिकारासाठी आम्ही अकरा वर्षे तयार राहिलो होतो. आणि मग एक चमत्कार घडला; आणि युद्ध संपले! २९ नोव्हेंबर १९५६ रोजी, पितृभूमी सोडल्यानंतर १४ वर्षांच्या वनवासानंतर मी तिचे पुनः दर्शन घेतले.

उत्तर क्यूशूच्या किनारपट्टीचे दर्शन होताच माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. त्या दिवशी आमच्या 'यामाहागी मारु' या बोटीवर माझ्याबरोबर माझे तीन दोस्त होते : ज्युहेई नाकानो, मासाजी इझुमिता आणि जिन्तारो इशी.

क्यूशू बंदर दृष्टिपथात आल्यावर बंदरावर हजारो लोक आमच्या स्वागतासाठी सिद्ध असलेले दिसले. नातेवाईक, सरकारी अधिकारी, वृत्तपत्रांचे बातमीदार आणि

नागरिक, मृत्यूच्या उंबरठ्यावरून परत आलेल्या आम्हा चौघांच्या हार्दिक स्वागतासाठी उभे होते.

आम्ही बंदरावर उतरलो आणि जयघोषाने तेथील वातावरण कितीतरी वेळ दुमदुमत राहिले. मग मला बोलायची संधी मिळाली. मी म्हटले, " या प्रसंगी मी परमेश्वराचे आभार मानतो. त्यानेच आमचा प्रतिपाळ केला आणि पुन: या पितृभूमीचे दर्शन घडवले. जपानला पुन्हा परतण्याचे आमच्या स्वप्नातही आले नव्हते." नंतर आम्ही काळजीपूर्वक वाहून आणलेल्या एका करंड्याकडे मी बोट दाखवले. त्या करंड्यात आमच्या आठ सहकाऱ्यांची रक्षा होती. अमेरिकन सैनिकांच्या प्रखर हल्ल्यापुढे पळ काढताना जंगलात त्यांतील तिघे मृत्युमुखी पडले होते; आणि पाचांचा अंत नंतरच्या काही वर्षांत झाला होता.

मी त्या रक्षा-करंडकाबद्दल बोलायला सुरुवात केली मात्र, सगळा कोलाहल एकदम थांबला. सगळ्यांचे चेहरे क्षणार्धात त्या रक्षा-करंडकाकडे वळले. मृतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी साऱ्या माना एकसाथ खाली लवल्या.

## प्रचंड अमेरिकन प्रतिहल्ले

चकचकीत उन्हाने प्रकाशलेल्या त्या बंदरावर, जपानच्या डोंगरमाथ्यावरून येणाऱ्या मधुर झुळुकेचा आस्वाद घेत उभा असताना मला अचानक १९४५ सालच्या वर्षारंभ दिनाची आठवण झाली. साऱ्या जगात नवीन आशादायी, शांततेचे आश्वासन देणारा कालखंड सुरू होत होता. आमच्या दृष्टीने मात्र एका भयाकुल संघर्षपर्वाची ती पहिली पहाट होती.

१९४४ सालच्या अखेरीस फिलिपाईन्समधील आमच्या सैन्याची अवस्था अत्यंत विकट झाली होती. जपानच्या दिशेने सरकणारे प्रचंड अमेरिकन प्रतिहल्ले मार्गातील सारे काही निपटीत होते. आम्ही बेभानपणे लढत होतो. क्वचित एखाद्या लढाईत आम्हांला विजयही मिळायचा. पण माघार ही सदाची कर्मकहाणी होती. अमेरिकनांच्या माऱ्यापुढे आमची अगदी दुर्दशा झाली होती.

वर्षारंभदिनी तर सारे चित्र अगदी स्पष्ट झाले होते. अमेरिकन आरमाराने आमच्या आरमाराचा धुव्वा उडवला होता. ज्या आमच्या हवाई दलाने फिलिपाईन्समधील अमेरिकन हवाई सामर्थ्याला सुरुंग लावला होता त्या आमच्या हवाई दलात आता काही खिळखिळी झालेली विमाने तेवढी होती. लेटे बेटात आमचे सहस्रावधी सैनिक मृत्युमुखी पडले होते. एकामागून एक बेट पादाक्रांत करीत अमेरिकन सैन्याच्या लाटा जपानच्या दिशेने धडकत होत्या. फिलिपाईन्समधील सर्वांत मोठे ल्यूझॉन बेट त्यांच्या आक्रमणाचे पुढील लक्ष्य होते.

मी त्या वेळी ल्यूझॉन बेटावरच होतो. जपानच्या सैन्यातील अत्यंत कडवी माणसे मिळून आमच्या तुकड्या सिद्ध झाल्या होत्या. आम्ही 'कमांडोज' होतो. युद्धांतील सर्वांत कठीण कामगिरी अपरिहार्यपणे कमांडोजवर टाकण्यात येई.

आमच्यापैकी प्रत्येकाला अत्यंत कठीण असे युद्धशिक्षण मिळाले होते. खंजिरापासून मशिनगनपर्यंत कोणतेही शस्त्र आम्ही परिणामकारकरीत्या चालवू शकत होतो.

## बिकट कामगिरी

पण माझ्या वाटचाला आलेल्या कामगिरीचा मी विचार करू लागलो त्या वेळी कमांडोजनादेखील ती झेपेल असे मला वाटेना. मिन्दोरो बेटाच्या दक्षिण टोकाला असलेल्या सॅन जोस विमानतळावर हल्ला करून तो विमानतळ ताब्यात घेण्याचा हुकूम मला वरिष्ठांकडून आला होता.

वर्षारंभदिनाची उषःप्रभा फाकण्यापूर्वीच तीन छोट्या बोटींतून आम्ही निघालो. या कामगिरीसाठी एवढ्या तीनच बोटी आम्हांला देण्यात आल्या होत्या. खरे म्हणजे छत्रीधारी सैनिक उतरवून तो विमानतळ ताब्यात घेणे शहाणपणाचे झाले असते. परंतु त्या वेळी जपानी हवाईदलाची अवस्था इतकी करुण होती की आमच्या कामगिरीसाठी एखादेही उतारूवाहू विमान मिळणे शक्य नव्हते.

एक अरुंद खाडी ओलांडून आम्ही मिन्दोरोच्या उत्तरेला कालापनजवळच्या किनाऱ्यावर आलो. असे केल्यामुळे अमेरिकेच्या सागरी टेहाळणीला आम्ही चुकवू शकलो होतो. आमच्यापैकी प्रत्येकाच्या मनात भीती होती. माथ्यावरून जाणारी शेकडो अमेरिकन विमाने आम्हांला दिसत. जपानी विमान मात्र कुठेच कधी दिसले नाही. ते दिसणे कसे शक्य होते म्हणा ! कारण एखादे जपानी विमान आकाशात दिसायचा अवकाश, अमेरिकन विमाने त्याच्यावर गर्दी करून त्याची वासलात लावून टाकीत.

कधीही विमानहल्ला होऊन आपण पराभूत होऊ, असे आम्हांला वाटत राहिले. आम्ही अगदी अगतिक होतो. आमच्या बोटींवर तोफा नव्हत्या. हातांमध्ये असलेल्या शस्त्रांखेरीज प्रतिकाराची अन्य साधने नव्हती. त्यांनी आम्ही काय प्रतिकार करणार ?

चमत्कारिक आवाज करीत, सारखा धूर ओकीत आमच्या तीन बोटींचा प्रवास सतत चालू होता. एका महत्त्वाच्या कामगिरीवर निघालेले सैनिक बोटीच्या पोटात आहेत अशी त्या बोटी पाहणाऱ्याच्या मनात कल्पनाही येणे शक्य नव्हते. बहुधा त्या-मुळेच आमच्या बोटींवर हल्ला झाला नसावा. या फालतू बोटींवर हल्ला करण्यात काय अर्थ, असा विचार अमेरिकनांनी केला असणार.

सूर्य उगवला आणि आम्ही एके ठिकाणी किनाऱ्यावर उतरलो. तात्रडतोब आम्ही विमानहल्ल्यापासून बचाव होण्यासाठी माडांच्या रायांचा आश्रय घेतला. आमच्या ठिकाणापासून आम्ही अजून पुष्कळच दूर होतो. ल्यूझॉनच्या उत्तरेला असलेले मिन्दोरो बेट प्रचंड आहे. फिलिपाईन्स बेटसमूहांपैकी अत्यंत दुर्घट असे हे बेट आहे. लाख सव्वा लाख लोकांची वस्ती असेल या मिन्दोरो बेटावर. आणि ते सगळे किनारपट्टीलगतच्या भागातच राहतात. किनारपट्टीपासून दूरचा मिन्दोरो बेटाचा

मध्यवर्ती भाग अत्यंत भीषण आहे. त्यामध्ये प्रचंड वेडेवाकडे डोंगर आहेत. भयंकर खोल दऱ्या आहेत. भोवरे आणि हिंस्र जलचर पोटी बाळगणाऱ्या अवघड नद्या आहेत. आणि घनदाट जंगल तर सर्वत्र माजलेले आहे. या भागातील कित्येक दिवसांच्या प्रवासातदेखील कोणी चिटपाखरूसुद्धा दृष्टीस पडत नाही.

झाडांचा आडोसा घेत आम्ही किनारपट्टीवरून जात कालापन येथील आमच्या स्थायी तळावरती येऊन पोचलो. तेथील अधिकाऱ्यांबरोबर आम्ही आमच्या कामगिरीबद्दल विचारविनिमय केला. आमची कल्पना होती त्यापेक्षाही ही कामगिरी बिकट होती. सॅन जोस विमानतळ अजून शंभर मैल दूर होता. आम्ही विमानाने सैन्य नेऊ शकत नव्हतो. भयानक जंगलातून वाट काढीत त्या स्थळापर्यंत पोहोचणेदेखील अशक्यच होते. त्यामुळे आम्हांला समुद्रमार्गे बोटीतून जाणे एवढा एकच मार्ग शक्य होता.

दिवसा किनाऱ्यालगत घनदाट जंगलांत आम्ही लपून राहत असू. शत्रूच्या दृष्टीस पडू नयेत म्हणून बोटीदेखील पानाफांद्यांनी आच्छादीत असू. अगदी जुजबी विमानहल्ल्यानेसुद्धा आमच्या कामगिरीचा फज्जा उडाला असता. परंतु ल्यूझाॅनच्या मोहिमेवर लक्ष्य एकवटलेल्या अमेरिकनांना आमच्या तीन फालतू बोटींकडे लक्ष द्यायला सवड नसावी.

प्रत्येक रात्री आम्ही चोरपायांनी बोटीत चढायचो आणि रात्रभर प्रवास करून सकाळी नवा मुक्काम गाठायचो. या कंटाळवाण्या प्रवासात दिवस जाता जात नव्हते. आमच्याजवळचा धान्यसाठा कमी होत होता. प्रत्येकाला अगदी मोजके कमीत कमी खायला-प्यायला मिळत असे. अंगावर घामाची आणि धुळीची पुटेच्या पुटे चढली होती. नाना जातींच्या भयानक कीटकांचे भक्ष्य आम्ही बनलो होतो. अंगावरच्या ओझ्यामुळे अंगे दुखू लागली होती. प्रत्येक रात्री आम्ही उघड्यावर जंगलातच झोपायचो. पडणारा पाऊस अगदी आमची हाडेदेखील भिजवायचा आणि विषुववृत्तावरचा सूर्य आम्हांला भाजून काढायचा. काही सैनिकांना जंगली रोग लागले, आणि अंगावरच त्यांची कातडी कुजू लागली. परंतु कोणी कधीही तक्रारीचा सूर काढला नाही.

जे अंतर विमानाने आम्ही तीस मिनिटांत काटू शकलो असतो ते काटायला आम्हांला जवळजवळ महिना लागला. जानेवारीच्या शेवटी आम्ही कुलासी-बे येथे येऊन पोचलो. आमच्याजवळचा धान्यसाठा अधिकच क्षीण झाला होता, आणि आम्ही पार थकून गेलो होतो. मागील प्रवास काहीच नव्हे असा पुढील कामगिरीचा प्रकार होता. समुद्रमार्गाने सरळ विमानतळावर हल्ला केला असता तर आमची सरसहा कत्तल झाली असती. किनाऱ्यावरील विमानतळाकडे येणाऱ्या आमच्या बोटी अमेरिकनांच्या सहज दृष्टीला पडल्या असत्या आणि त्यांनी तोफा व विमाने यांनी आमची चाळण उडवली असती. त्यामुळे पिछाडीने जमिनीवरूनच हल्ला चढवणे



**जिथे तीस मिनिटात पोचू शकत होतो तिथे पोचायला महिना-महिना लागे.**

भाग होते. पण त्या करिता घनदाट जंगल तुडवीत, अनेक अवघड पर्वतकडे ओलांडीत तेथे पोचणे आवश्यक होते.

बोटी आम्ही तेथेच सोडल्या. सतत आठ दिवस आम्ही त्या माजलेल्या जंगलातून मुंगीच्या गतीने वाट काढीत होतो. कित्येकदा पुढचातील जंगलजाळे मोडून काढीत आम्हांला वाट तयार करावी लागे. कधीकधी भीषण पर्वत-कडे ओलांडावे लागत तर कधी अवघड नद्या आणि नाले. कधी कधी अचानक दलदलीचा प्रदेश लागायचा आणि तेथे कधी गुडघाभर तर कधी कंबरभर चिखलातून पुढे जावे लागे. सूर्यदर्शन आम्हांला क्वचितच होई. परंतु सर्वत्र गुदमरवून टाकणारी उष्णता होती आणि घामाची संततधार लागलेली असायची. रात्री झोपलो म्हणजे विचित्र विचित्र कीटक अंगावर चाल करायचे. या कीटकांच्या हल्ल्यामुळे तर कित्येकांना वेड लागायची पाळी आली. उष्णता आणि दमटपणा यांमुळे अनेकांची प्रकृती ढासळली. सततच्या दमटपणामुळे अंगावर पडलेल्या जखमा चिघळत राहिल्या.

## बांझाय् ! बांझाय् !

सरतेशेवटी पाच फेब्रुवारी १९४५ रोजी संध्याकाळी आम्ही एका टेकडीच्या माथ्यावर येऊन पोचलो. खाली सॅन जोस विमानतळ दिसत होता. मी उदास झालो. डझनावारी अमेरिकन विमाने आकाशमार्गे गस्त घालीत होती. विमानतळावर कितीतरी विमाने युद्धसज्ज उभी होती. सॅन जोस बंदरात अनेक युद्धनौका होत्या. शेकडो शस्त्रसज्ज अमेरिकन सैनिक आम्हांला इतस्ततः दिसत होते. मी विचार करू लागलो. जर सर्व शक्ती एकवटून हल्ला चढवला तर कदाचित या विमानांना आग लावण्यात आपण यशस्वी होऊ. तेलटाक्यांमुळे आणि बॉम्बसाठ्यांमुळे आग भडकवणे तसे शक्य होते. दारूगोळ्याचे आणि तेलाचे साठे उडवू शकलो तर कदाचित त्या

गदारोळात हा विमानतळही काबीज करता येईल. अत्यंत साहसी हल्ल्यानेच यश मिळण्याची थोडीतरी शक्यता होती. सावधपणाचे तेथे काम नव्हते. आमची संख्या थोडी होती. शस्त्रसामग्री बेताची होती आणि लढा द्यायचा होता तो सर्वतोपरी समर्थ असलेल्या अमेरिकन ठाण्याशी. आम्ही ' बांझाय् ' पद्धतीने हल्ला चढवण्याचे ठरवले. बांझाय् पद्धत म्हणजे एककेंद्री हल्ला चढवण्याची आत्मघातकी पद्धत.

आम्ही जमिनीवर विसावलो. विश्रांती घेत अंधार पडण्याची वाट पाहू लागलो. निघण्यापूर्वी अखेरचे मद्यचषक भरले. हल्ला करणाऱ्या तीन तुकड्यांपैकी एकीचे नेतृत्व माझ्याकडे होते. मी शिरावर नंगी तलवार उचलून धरली. माझ्या तुकडीतील सैनिकांवरून अखेरचा दृष्टिक्षेप टाकला आणि ' बांझाय् बांझाय ' असा रणघोष करीत वेगाने टेकडी उतरायला सुरुवात केली. पायथ्याशी आल्यावर गोळ्यांच्या फैरी झाडत आम्ही अमेरिकनांवर नुसते तुटून पडलो.

कित्येक अमेरिकन सैनिक धरणीवर कोसळताना मी पाहिले. परंतु ज्या वेळी आम्ही या विमानांना आगी लावू शकू असे वाटू लागले, त्याच वेळी अचानक एका बाजूने अमेरिकनांच्या राखीव तुकडीने आमच्यावर हल्ला चढवला. म्हणजे अमेरिकन सैनिक आमच्यासाठीच दबा धरून बसले होते तर ! ते बेसावध आहेत ही आमची कल्पना खोटी ठरली होती. आम्ही त्यांच्या माऱ्याच्या टप्प्यात येण्याचीच वाट पाहत होते ते. त्यांच्या या हल्ल्याने आमची अगदी दुर्दशा झाली. आम्ही भांबावून गेलो. हल्ल्याचा जोर इतका विलक्षण होता की एकजात सारा सैनिक धारातीर्थी पतन पावणार अशी खात्री वाटू लागली.

माझ्याबरोबर खांद्याला खांदा भिडवून लढणाऱ्या एका सैनिकाच्या छातीत गोळी बसली. एखाद्या पिसाळलेल्या जनावरासारखा त्याने चीत्कार केला आणि तो हवेत उडाला तेव्हा त्याचा चेहरा तिढावाकडा झाला होता. हवेतून जमिनीवर कोसळण्यापूर्वीच त्याच्या अंगात गोळ्या घुसत राहिल्या. धरणीवर कोसळण्यापूर्वीच तो मृत्यू पावला होता. आणखी एका सैनिकाच्या पोटात गोळी घुसली आणि कातडे फाडून त्याचा कोथळा बाहेर आला. अभावितपणे दोन्ही हातांनी त्याने तो सावरून धरला. तशा अवस्थेत तोंड वासून एखाद्या पाषाणाच्या पुतळ्यासारखा तो क्षणभर उभा होता. इतक्यात एक गोळी त्याच्या मस्तकात घुसली आणि तो आडवा झाला.

माझ्याभोवती प्रेतांचा नुसता खच पडला. मांसाचे आणि हाडांचे तुकडे हवेत इतस्ततः उडत होते. मात्र काढता पाय घेण्याचे काही काळ तरी कोणाच्याही मनात आले नाही. आम्ही गोळीबार चालूच ठेवला. पण थोड्याच वेळात नाईलाजाने आम्हांला मागे परतावे लागले. नाहीतर आमची कत्तलच झाली असती. आम्ही पुन्हा पुन्हा हल्ला चढवला आणि पुन्हा पुन्हा आणखी काही प्राणांचे मोल देऊन आम्हांला मागे परतावे लागले. माझे भाग्य अलौकिकच म्हटले पाहिजे. कितीतरी



**गोळ्या उडत होत्या**
**माणसे कोसळत होती.**

गोळ्या माझ्या कपड्यांना चाटून गेल्या. कितीतरी बॉम्ब माझ्या अगदी जवळ फुटले, कितीतरी वेळा क्षणार्धापूर्वी मी ज्या जागेवरून हललो होतो त्या जागेवरच्या सैनिकाची राखरांगोळी झालेली मी पाहिली. माझ्यावर कोठल्या देवतेचा वरदहस्त होता नकळे; पण मला एकही जखम झाली नाही.

आम्ही जंगलात पळाल्यानंतर अमेरिकनांनी आमचा पाठलाग चालू केला. विजयाची धुंदी त्यांना चढली होती, आणि त्यामुळे पाठ फिरवलेल्या आमच्या पलटणीची ते अक्षरशः लांडगेतोड करीत होते. गोळ्या अजून उडत होत्या. जखमांनी माणसे अजून विव्हळत होती. क्वचित मृत्युवश होऊन धरणीवर कोसळत होती.

जवळजवळ दोन महिने पाठीवर अमेरिकन सैनिक आणि पुढे आडमुठे जंगल या दोन आघाड्यांवर संग्राम आम्ही करीत जीव वाचवण्याचा यत्न करीत होतो. मात्र जंगल घनदाट असल्यामुळेच मोठ्या संख्येच्या अमेरिकनांना आम्ही चकवू शकलो. अमेरिकन विमानांनी आकाशामधून, आम्ही अमूक एका ठिकाणी असू असे अंदाज बांधीत वेळोवेळी हजारो फैरी झाडल्या. परंतु वृक्षवल्लींनी आमच्याशी सोयरीक केली होती आणि आमची शिस्त जरादेखील ढिली पडली नव्हती. त्यामुळे लढाऊपणा तेवतच राहिला.

मात्र जसजसे आणखी दिवस जाऊ लागले तसतसा शारीरिक आणि मानसिक ताण असह्य होऊ लागला. आमच्याजवळचे खाद्यपदार्थ जवळजवळ संपलेच होते. औषधांचा साठादेखील संपुष्टात आला होता. हळूहळू एक एक माणूस धरणीवर आपल्या अखेरच्या एकाकी अंतासाठी कोसळत होता. मात्र कोणीही मदतीची याचना केली नाही. दुसऱ्यावर भार टाकण्याचा प्रत्येकालाच संकोच वाटत होता.

आमच्या कोसळणाऱ्या मित्रांना जंगली श्वापदांचे भक्ष्य होण्यासाठी तेथे टाकून जाताना आमचे अंतःकरण तुटत होते. परंतु त्यांच्या मृत देहांना अग्निसंस्कार करणे धोक्याचे होते. धुरामुळे आमचा ठिकाणा शत्रूला कळला असता. मात्र त्यांची यादगारी राहावी म्हणून त्यांच्या केसांच्या बटा पितृभूमीला नेण्यासाठी आम्ही जपून बरोबर घेत होतो.

आमची वाटचाल चालूच होती. दुसरे काही करणे त्या परिस्थितीत शक्यच नव्हते. जणू आमच्या अवतीभवती एक निराळेच विश्व प्रकटले होते आणि त्या विश्वातील विचित्र वातावरणाला अनुरूप अशी आमची देहस्थिती आणि मनःस्थिती घडवली जात होती. सुधारलेल्या जगातील कोणाही असामीचे पाऊल या जागी पडलेले नसावे. दिशाहीन अवस्थेमध्ये आम्ही भरकटत होतो. अमेरिकन सैनिकांचा जाचक पाठलाग कधीच संपला होता. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला एका एकाकी पर्वतशिखरावर आम्ही येऊन पोचलो. मागील कित्येक दिवसांत अमेरिकन सैनिकांचा मागमूसदेखील आम्हांला लागला नव्हता. मी नकाशा काढून पाहिले. सॅन जोस विमानतळाच्या ईशान्येला असलेल्या पर्वतशिखरावर आम्ही होतो.

येथे राहण्यात धोका होता हे खरे; पण आम्ही फार दमलो होतो. काही दिवस तेथे राहून गेलेली शक्ती पुन्हा मिळविण्याचा यशस्वी प्रयत्न आम्ही केला. त्यानंतर मिन्दोरोच्या पूर्व किनाऱ्यावरील रोक्सासच्या दिशेने आम्ही पुन्हा पायपीट आरंभिली. तेथे पोचल्यावर मात्र आम्हांला धक्काच बसला. समुद्रात शेकडो अमेरिकन युद्ध आणि मालवाहू बोटी उभ्या होत्या. आणि आकाशदेखील भिरभिरणाऱ्या असंख्य अमेरिकन विमानांनी भरून गेले होते. नाउमेद होऊन आम्ही माघारी फिरलो आणि पुन्हा जंगलाचा आश्रय घेतला. पुष्कळ दिवसांनंतर बाँगाबाँग नदीच्या तीरावर आम्ही मुक्काम केला. नंतर तेथून उगमाच्या दिशेने वाटचाल करू लागलो. काही आठवड्यांच्या प्रवासानंतर, एक अतिदुर्गम पर्वतकडा ओलांडून आम्ही एका पठारावर आलो. सुमारे आठ हजार फूट उंचीच्या बाको आणि हचूटो या दोन आवळ्याजावळ्या पर्वतशिखरांच्या मध्ये हे सुबक पठार पसरले होते. पठाराला नैसर्गिक संरक्षण चांगलेच होते. तो जून महिना होता. ज्या ठिकाणी आम्ही आयुष्याची पुढील अकरा वर्षे घालवणार होतो ते हेच ठिकाण याची आम्हांला तेव्हा कशी कल्पना असणार ?

आमच्यापैकी आता फक्त नऊजण शिल्लक राहिले होते. एकशे एकवीस सहकारी या मोहिमेत मृत्यू पावले होते.

ते पठार म्हणजे आमच्या थकल्या भागल्या जीवांना नंदनवनच होते. समुद्रसपाटीपासून चार हजार फूट उंचीवरच्या त्या पठारावर थंड आणि उत्साहवर्धक वारे वाहत होते. चमत्कारिक आकारांचे, आवाजांचे, वासाचे जंगल आता खाली राहिले होते. अगणित रानटी फुलांनी येथील हवेत सुखद सुवासांचे अत्तरच जणू

उचळले होते. हजारो चिवचिवत्या पक्ष्यांनी आणि कलकलाट करणाऱ्या खोडकर माकडांनी झाडे भरून गेली होती. जंगलातल्या भीषण वास्तव्यानंतर आम्ही जणू आमचे कुशल इच्छिणाऱ्या पऱ्यांच्या राज्यात आलो होतो.

## पऱ्यांच्या राज्यात !

आसमंताची पाहणी करण्यासाठी मी ताबडतोब टेहळे पाठवले. कारण, एकूण प्रदेश शांत आणि अनुकूल दिसत असला तरी तद्देशीय रानटी टोळ्यांच्या अस्तित्वाची शक्यता गृहीत धरणे भागच होते. टेहळ्यांनी मोठी आनंदाची बातमी आणली. जवळच सुमारे शंभर लोकवस्तीचे एक छोटेसे खेडे होते. त्यातील माणसे रानटी असली तरी स्नेहभाव दाखवणारी होती. मी तत्काळ निर्णय घेतला. यापुढे आम्ही येथेच राहणार होतो.


या निर्णयाने आमच्या एका नव्या अद्भुत जीवनक्रमाला सुरुवात झाली. रॉबिन्सन क्रूसोच्या धाडसी आयुष्याशी तुलना करता येईल असे आयुष्य आम्ही जगलो.

नाकानो आणि इझुमिता या दोन सैनिकांना मी टोळीवाल्या लोकांशी बातचीत करायला पाठविले. त्यांना विश्वास वाटावा म्हणून दोघांनीही आपल्या बंदुका पाठीवर बांधल्या होत्या. वस्तीपाशी गेल्यावर त्यांनी चेहऱ्यावर भलेमोठे हास्य धारण केले आणि हात पुढे करून मैत्रीचा इरादा जाहीर केला. हातांमध्ये काही वस्तू आणि घड्याळदेखील होते. परक्या लोकांवर जरासुद्धा विश्वास न ठेवणाऱ्या आणि हातांत भल्या मोठ्या तलवारी घेतलेल्या त्या रानटी लोकांजवळ निःशस्त्र जाण्यात मोठाच धोका होता. परंतु प्रसंगच येता तर नाकानो आणि इझुमिरा यांच्या पिस्तुलबाजीचा वेग त्यांचा बंदोबस्त करू शकला असता.

परंतु त्या रानटी लोकांनी त्यांचे स्वागतच केले. थोड्याच वेळात नाकानो आणि इझुमिरा काही खाद्यपदार्थ आणि एक प्रचंड तलवार घेऊन परतले. या तलवारीचा चांगला उपयोग झाला आम्हांला. तिच्या पात्याचे तुकडे करून आम्ही छोटी छोटी उपकरणे आणि हत्यारे बनवली. सुतारकामासाठी आमच्या संगिनी आणि तलवारी वापरणे आमच्या जिवावर आले असते. अमेरिकन सैनिक अजून आमचा शोध करीत आहेत असेच आम्हांला वाटत होते. आणि वेळ येईल तेव्हा त्यांना तोंड देण्यासाठी शस्त्रे सज्ज ठेवणे आम्हांला आवश्यक वाटले.

मी निर्णय घेतल्या क्षणापासून आम्ही सगळे तेथे दीर्घकाळ वास्तव्य करण्याच्या दृष्टीने तयारीला लागलो. हा काळ अकरा वर्षांएवढा दीर्घ असेल असे आमच्या स्वप्नातही आले नसते.

इझनावारी झाडे आम्ही पाडली. नाकानो धंदेवाईक सुतार होता. त्याने आम्हांला सुतारकी शिकवली. सतत काम करून लौकरच आम्ही एक छोटीशी पण मजबूत झोपडी बांधली. झोपडी ओबडधोबडच होती; पण आम्हांला मात्र ती एखाद्या



फार दिवसांनंतर हे सुख मिळत होते.

आलिशान हवेलीसारखी भासत होती. कितीतरी महिन्यांनंतर आम्हांला चार भिंतींचा सुखद निवारा लाभला होता.

तद्देशीय लोकांकडून मिळालेल्या खाद्यपदार्थांत एक चमत्कारिक जातीच्या रताळ्याचा कंद होता. आम्ही तत्परतेने काही एकर जमीन नांगरली आणि रताळी पिकवायला सुरुवात केली.

इशीच्या घरची शेतीवाडी होती. त्याने आम्हांला शेतीचे तंत्र शिकविले. सुदैवाने भोवतालची कुवार जमीन अत्यंत सुपीक होती, आणि अल्पावधीतच पैदास दामदुपटीने होऊ लागली. सुरुवातीला आमच्या आणि रानटी लोकांच्या शेतकामांत काही फारसा फरक नव्हता. विनिमयाच्या पद्धतीने आम्ही शेतकऱ्यांकडून विविध जातींची बी-बियाणे मिळवून पैदाशीत विविधता आणण्याचा यत्न करू लागलो. पहिली तीन वर्षे अत्यंत खडतर गेली. शेजारी तद्देशीय आमच्याकडे मित्रभावनेने पाहत; पण आमच्यात मिसळायला मात्र ते तयार नव्हते. वस्तुविनिमयापलीकडे त्यांचा आमचा काहीही संबंध नाही अशी जणू काही ताकीदच त्यांनी आम्हांला त्यांच्या वागणुकीन दिली होती. या कालखंडात त्या लोकांकडून जीवनावश्यक वस्तू मिळविण्यासाठी आम्ही आमच्याकडील बहुतेक साऱ्या बहुमोल वस्तू गमावल्या होत्या. अगदी कपडेदेखील. आमची शस्त्रे मात्र शाबूत होती. पहाऱ्याचे आणि टेहळणीचे काम पहिल्या दिवशी जसे तत्परतेने केले गेले तसेच नंतर प्रत्येक दिवशी करण्यात आले. आम्ही जपानी सैनिक आहोत याचा आम्हांला एक क्षणदेखील कधी विसर पडला नाही. खरे सांगायचे तर मोठ्या प्रमाणावरील हल्ल्याची भीती आम्हांला वाटत होती. अमेरिकनांना तेवढे आम्ही डरत नव्हतो. आमच्यासारख्या

मूठभर भुरट्या सैनिकांना टिपण्यासाठी अवघड पर्वत-कडे ओलांडून आणि भीषण जंगल तुडवून अमेरिकन सैनिक येतील असे वाटेना. परंतु फिलिपिन गनिमी सैनिक मात्र आम्हांला टिपण्याचा हरएक प्रयत्न करतील असे वाटे. जपानी युद्धकैद्यांचा छळ करण्यात त्यांना मोठा आनंद होई. त्यांच्या भीतीने आम्ही पहाऱ्याचे आणि गस्तीचे काम कधीही शिथिल होऊ दिले नाही.

## अखंड सावधपण

पाच निरनिराळ्या प्रसंगी पहारेकऱ्यांनी आम्हांला गनिमांच्या आगमनाची वर्दी दिली. परंतु असे आभास अनेकदा जंगल निर्माण करते. म्हणून प्रत्यक्ष पाहून खात्री केल्याशिवाय गोळीबार करायला मी सक्त मनाई केली होती. यात चूक झाल्यास अत्यंत कडक शिक्षा ठेवली होती. माझ्या कठोरपणाचा, मला वाटते, मोठा फायदाच झाला. कारण, त्यामुळे जंगलात निश्चितपणे वावरणाऱ्या एखाद्या तद्देशीय माणसाला इजा पोचून त्या जमातीचा रोष आमच्यावर ओढवण्याचा संभाव्य धोका टळला. मात्र तब्बल अकरा वर्षे आम्ही धनुष्याच्या ताणलेल्या दोरीसारखे सावध होतो. कोणत्याही क्षणी युद्ध करायची आमची तयारी होती. आठवड्यातून दोनद आम्ही बंदुकांना तेलपाणी देत असू आणि तलवारींना व संगिनींना धार लावीत असू.

मोठ्या आश्चर्यकारक रीतीने आम्ही या नव्या जीवनपद्धतीशी जुळवून घेतले. शेजाऱ्यांकडून आम्ही काही पाळीव प्राणी विकत घेतले आणि लौकरच आम्ही डुकरांची व कोंबड्यांची पैदास करू लागलो. त्यामुळे आम्हांला कोंबड्या, अंडी, डुकराचे मांस हे पदार्थ मर्यादितपणे पण सतत मिळत गेले. डुकराचे कातडे अनेक दृष्टींनी उपयुक्त ठरले. दोन एकरांमध्ये आम्ही तांदूळ, मका, बटाटा आणि ऊस यांचे उत्पादन केले.

पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सतत व्हावा आणि आंघोळीलाही मुबलक पाणी मिळावे म्हणून आम्ही लाकडी पन्हाळींच्या यंत्रणेने जवळच्या खळाळत्या झऱ्याचे पाणी झोपडीत आणण्याची मोठी सुखावह सोय केली. स्वच्छतेचा प्रश्न अशा रीतीने मोठ्या समाधानकारक रीत्या सुटला. आमचे कपडे आम्ही तद्देशीय लोकांना देऊन टाकले होते. मग लाकडाच्या तंतूंपासून वस्त्र विणण्याची कला आम्ही शिकलो. आमची कपड्यांची गरज त्यामुळे भागली. पठारावर आल्यानंतर थोड्याच दिवसांनी आमच्याजवळच्या काड्यापेट्यांचा साठा संपून गेला होता. मग गारगोटी आणि लोखंड जमा करून त्यांच्या साहाय्याने अग्नी निर्माण करण्याच्या प्रयत्नाला आम्ही लागलो आणि लवकरच या रानटी कलेत आम्ही प्रावीण्य संपादन केले. गरम पाण्यासाठी आणि अन्न व्यवस्थित शिजविण्यासाठी दगडांच्या आणि चिखलाच्या साहाय्याने आम्ही कितीतरी चुली तयार केल्या होत्या. आम्हांला नारळाच्या करवंट्यांचा भांड्यांप्रमाणे उपयोग करता आला. तेथे मिळणाऱ्या अनेक प्रकारच्या

कठीण कवचीच्या फळांपासून नाकानोने सोंगट्या आणि बुद्धिबळे तयार केली. ते खेळण्यात आमचे कितीतरी तास मोठ्या मजेत गेले.

आमचे बस्तान जेमतेम बसल्यावर झोपडीमध्ये आम्ही एक छोटासा चौथरा तयार केला. या चौथऱ्यासमोर उभे राहून आम्ही आमच्या दिवंगत सहकाऱ्यांना श्रद्धांजली वाहत असू. या दैनंदिन धार्मिक कृत्यामुळे आम्हांला नकळत धीर येत असे.

काही वर्षांतच आम्ही स्वयंपूर्ण झालो होतो. अंगावर हळूहळू मांस चढत होते, आणि प्रकृती झपाट्याने सुधारत होती. मनावर सुरुवातीला असलेले उदासीनतेचे पटलदेखील हळूहळू विरत गेले आणि पितृभूमीचा अमेरिकेशी चालू असलेला लढा थंडावेपर्यंत त्याच एकाकी पठारावर शेतकरी म्हणून राहण्याची आम्ही तयारी केली होती.

युद्ध १९४५ सालीच संपले असेल, असे आमच्या स्वप्नातही आले नव्हते. त्यानंतर काही महिन्यांनी आमच्या पठारावरून उडत जाणाऱ्या विमानांनी टाकलेल्या पत्रकांपैकी एक पत्रक आमच्या हाती लागले. युद्ध संपले असून साऱ्या जपानी भूमिगत सैनिकांनी शरणागती पत्करावी, असे त्या अमेरिकन पत्रकातील आवाहन वाचून आम्हांला हसूच फुटले होते. आम्हांला वाटले होते, किती खोटा आणि घाणेरडा प्रचार आहे हा ! म्हणे जपानची शरणागती. जपानी सैनिक कधीच शरण येत नसतो, अशी आमची धारणा होती. मग अखिल राष्ट्र गुडघे टेकील, याची कल्पना तरी कशी करावी ?

वास्तविक पाहता, आमच्या कमांडोज तुकड्या कार्यान्वित झाल्या, त्या वेळी फिलिपाईन्समधील युद्धपरिस्थिती अत्यंत बिकट झाली होती. परंतु वर्षानुवर्षांची काटेकोर शिस्त, कडवे शिक्षण आणि अखंड प्रचार यांमुळे आम्हांला वाटायचे की, काहीतरी दैवी चमत्कार घडेल आणि अंतिम विजय जपानचाच होईल.

स्वतःवर लादून घेतलेली शिस्त आम्ही या अकरा वर्षांच्या दीर्घकाळात कधीही शिथिल केली नाही. दर महिन्याच्या बारा तारखेला सॅन जोस विमानतळावरच्या हल्ल्यात आणि नंतर माघार घेतल्यावर त्या भीषण जंगलात मृत्युमुखी पडलेल्या आमच्या सहकाऱ्यांची स्मृती आम्ही जागवत असू. चार राष्ट्रीय महत्त्वाचे दिवस आम्ही साजरे करीत असू : राज्यसंस्थापना दिन–अकरा फेब्रुवारी; राजे हिरोहिटो यांचा वाढदिवस–एकोणतीस एप्रिल; सम्राट मेयूजी यांचा वाढदिवस–तीन नोव्हेंबर; आणि वर्षारंभ दिन– एक जानेवारी.

आमच्या सात वर्षांच्या या नव्या जीवनक्रमानंतर १९५२ साली आमच्यावर परमेश्वराची अवकृपा झाली. फुजिओ ताके नाका या कॉर्पोरलला ताप येऊ लागला. तो कसला ताप होता कोण जाणे, पण त्याला होणाऱ्या वेदना पाहवत नसत. आमच्याजवळ कसलीही औषधे नव्हती. उपचारांचे ज्ञानही नव्हते. मृत्यूच्या मार्गाने हळूहळू प्रवास करताना त्याला पाहणे, एवढेच आमच्या नशिबी होते. पुढील वर्षा–

सव्वा वर्षात या तापाने आणखी चार सहकारी दगावले. आता फक्त आम्ही चौघे-जण उरलो.

आपल्या जिवलग मित्रांच्या मृत्यूने जिन्तारो इशीचे हृदय भग्न झाले. दुःखाने आणि एकाकीपणाने सैरभैर झाल्यामुळे माझा एक अत्यंत कडक नियम त्याने मोडला. एक व्यापार सोडता तद्देशीय लोकांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न कोणी करता कामा नये, असा माझा सक्त हुकूम होता. तो सपशेल धुडकावून जिन्तारो इशी शेजारच्या वस्तीत गेला आणि भटकत राहिला. मी त्याला क्षमा केली; कारण आपण काय करीत आहो, याचे त्या वेळी त्याला भानच नसावे, असे मला वाटले.

परंतु जिन्तारो इशीच्या अशा बेजबाबदार वागण्याने आमच्यावर उपकारच झाले म्हणायचे. कारण त्यानंतर अचानक तद्देशीयांचा स्नेहभाव वृद्धिगत झालेला आढळला. पुढे तो सतत अधिकाधिक गाढ होत गेला. आम्ही त्यांना शेतीचे तंत्र शिकवले. जमिनीतून तण कसे काढावे, पेरणी कशी करावी आणि उत्पादन जास्तीत जास्त कसे वाढवावे, याची माहिती आम्ही त्यांना दिली. त्यांनी आम्हांला त्यांच्या उत्सवाचे आमंत्रण दिले. हे घडले १९५४ साली : म्हणजे आम्ही त्यांच्याशेजारी झोपडी बांधून राहायला लागल्यानंतर पूर्ण नऊ वर्षांनी !

ज्युहेई नाकानो हा आमच्यातील मोठा कल्पक मनुष्य होता. दिनक्रमाच्या तोचतो-पणाचा कंटाळा येऊन असेल कदाचित. त्याने काही बासऱ्या तयार केल्या. बांबू-पासून तयार केलेल्या पीळदार धाग्यांचा तारांसारखा उपयोग करून गिटर आणि व्हायोलिन ही वाद्ये त्याने बनवली. लाकडाच्या ओंडक्यांपासून आम्ही पडघम केले. अशा रीतीने आमचा विलक्षण वाद्यवृंद सिद्ध झाला. त्यांचा स्वरमेळ कितपत जमत होता, याची चिकित्सा कोणीच केली नाही. परंतु केळ्यांपासून तयार केलेली घर-गुती दारू झोकल्यानंतर या वाद्यांचा स्वरमेळ मोठा संतोष द्यायचा हे मात्र खरे.

## आम्ही अजून सैनिक होतो !

याच सुमारास एक तद्देशीय मुलगी इशीच्या प्रेमात पडली. नऊ वर्षांत आम्हांला स्त्रीचा सहवास नव्हता. माझ्या कडक शिस्तीमुळे मला आणि माझ्या सहकाऱ्यांना तद्देशीय मुलींशी बोलतादेखील येत नसे. मात्र एकदा १९५४ सालानंतर त्यांची मैत्री अधिकाधिक वाढू लागल्यावर त्यांना टाळणे अशक्य होते.

इशीच्या प्रेयसीने त्याला आपल्या आईवडिलांकडे नेण्याचा हेकाच धरला होता. ती मोठी खूबसूरत मुलगी होती. आता मोठा विचित्र पेचप्रसंग निर्माण झाला होता. गेली नऊ वर्षे आम्हांला स्त्रीसौख्य पारखे झाले होते. आणि इथे ही तारुण्याने मुस-मुसलेली मुलगी इशीला आपले सर्वस्व अर्पण करायला उत्सुक झाली होती. आमच्या अंगांवर कपडे जवळजवळ नसतच आणि त्या मुलींदेखील लज्जारक्षणार्थ योजलेली चिंधुक सोडता बाकी अनावृतच असत. त्यांचा मजबूत बांधा आणि विशषतः, अनावृत स्तनमंडले यांनी आमचा कामविकार जागृत होत असे.



**मैत्री वाढू लागली.**

परंतु त्यामुळे जीवनाची बसलेली घडी विकसटून टाकायला आमची तयारी नव्हती. आम्ही अजून शपथबद्ध सैनिक होतो. इशीलादेखील त्याची जाणीव होती. त्यामुळेच अत्यंत अवघड असूनदेखील त्याने त्या मुलीशी संभोगसंबंध टाळला होता. सारे विसरून ज्याची अपेक्षा करावी ते आपण होऊन बाजूला ढकलताना इशीने केवढा अचाट संयम प्रकट केला ! मात्र या संयमामुळेच पुढील आपत्तीतून आम्ही सुटलो.

२५ ऑक्टोबर १९५६ रोजी आमच्या एका शेजारी मित्राने आमच्या झोपडीचे दार ठोठावले. त्याच्यावरोबर एक पोलीस अधिकारीसुद्धा होता. त्यासरशी आम्ही सावध झालो. कोणत्याही क्षणी गोळीबार करण्याची सिद्धता केली. वेगावेगाने हातवारे करून पोलिसाला न मारण्याविषयी तो मित्र आम्हांला सूचना देत होता.

पोलीस अधिकाऱ्याने मनिला येथील जपानी वकिलातीकडून आलेले पत्र माझ्या हाती ठेवले. मी दिङमूढच झालो. अत्यंत काळजीपूर्वक पुन्हा पुन्हा ते पत्र वाचले. ते पत्र आणि त्याचे पाकीट व्यवस्थित न्याहाळले. पत्रातील वाक्यरचनेचा, ते बनावट आहे की काय हे पाहण्यासाठी, अंदाज घेतला आणि कितीतरी वेळानंतर आश्चर्यचकित होत्साता मी खाली बसलो. पत्र बनावट नव्हते !

जपानने शरणागती पत्करली होती-- अकरा वर्षांपूर्वी ! आमचा पराभव झाला होता. अखेर मी माझ्या सहकाऱ्यांकडे पाहिले. व्यथित अंतःकरणाने त्यांना त्यांची शस्त्रे खाली ठेवायला सांगितले. जपानने शरणागती पत्करली यावर त्यांचा विश्वासच बसेना. पोलीस अधिकाऱ्याने आम्हांला कितीतरी जपानी वर्तमानपत्रे आणि मासिके दिली. अकरा वर्षांपूर्वीच जपानने शरणागती पत्करली यावर आमचा कसा विश्वास बसावा ? पण जर आमच्या सम्राटाने शरणागतीचा मार्ग स्वीकारला असेल तर आम्हांलाही त्याच मार्गाने जाणे भाग होते.

## पितृभूमीचे पुनर्दर्शन

आमच्या शरणागतीची वार्ता शेजारच्या वस्तीत वेगाने पसरली. थव्याथव्याने माणसे आमच्या झोपडीपाशी गोळा झाली. आम्ही जाऊ नये 'म्हणून मनधरणी करू लागली. आपल्या दुःखाला मुक्तपणे वाट देऊ लागली. आमची अंतःकरणे-देखील व्याकुळ झाल्यावाचून कशी राहतील ?

त्याच रात्री त्या रानटी जमातीचा प्रमुख आमच्या झोपडीमध्ये आला. इशीने एकट्याने तरी मागे राहावे अशी त्याची तो मनधरणी करू लागला. इशीला त्या जमातीमध्ये सामावून घेण्याची तयारी त्याने दर्शविली. आणि इशीलाही खरे म्हणजे तेथे राहायचे होते. पण ते कसे शक्य होते. कारण राहण्या न राहण्याचा निर्णय त्याच्या हातात कुठे होता. तो होता हुकमाचा ताबेदार ! त्याचा वरिष्ठ अधिकारी शरणागती पत्करत होता. इशीलादेखील शरणागतीच्या त्या सगळ्या चक्रातून बाहेर पडेपर्यंत स्वतंत्र निर्णय घेता येत नव्हता.

अखेरशेवटी तो जमातप्रमुख निघून गेला. इतक्यात इशीची खुद्द प्रेयसीच धावत तेथे आली, आणि तिने इशीच्या पायी लोळण घेतली. इशीने तेथेच राहावे असा तिने करुण हेका चालवला. पण इशीचा नाईलाज होता.

आम्हाला नंतर समजलेली गोष्ट अशी होती की जर इशीने त्या मुलीशी संभोग ठेवला असता तर त्याला ते पठार सोडणे कधी शक्यच झाले नसते. कुमारिकेबरोबर संभोगसुखाचा अनुभव घेणाऱ्या माणसाला त्या टोळीतून कधीच बाहेर पडता येत नाही, असा त्या टोळीचा नियमचा होता मुळी. त्या मुलीची तपासणी करण्यात आली होती. संभोगसंबंध ठेवून पठार सोडण्याचा प्रयत्न केला असता तर इशीला प्राण गमवावे लागले असते.

दुसऱ्या दिवशी मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी फिलिपाईन्सच्या अधिकाऱ्यां-समोर औपचारिक शरणागती पत्करली. आठ बंदुका, एक पिस्तुल, सहाशे फैरी झाडता येतील इतक्या गोळ्या, तलवारी, संगिनी आणि शंभरांच्यावर हातबॉम्ब इतकी सामग्री आम्ही त्यांच्या हाती सुपूर्द केली. प्रत्येक हत्याराची अत्यंत व्यवस्थित निगा राखलेली होती. त्या अधिकाऱ्यांना या गोष्टीचे कौतुक वाटल्यावाचून राहिले नाही.

सैनिकी विमानातून आम्हांला प्रथम कालापन येथे नेण्यात येऊन पुढे मनिलाला आणण्यात आले. फिलिपाईन्सच्या अधिकाऱ्यांनी येथे आमची उलटतपासणी घेतली आणि दोन नोव्हेंबर रोजी आम्हांला आमच्या वकिलातीकडे सुपूर्द केले. आणि त्यानंतर म्हणजे चौदा वर्षांनी आमच्या पितृभूमीचे पुनर्दर्शन आम्हांला झाले !

O

# बंगाली चित्र हाटे बाजारे

मानवी स्वभावातील बारकावे हेरून ते अचूक टिपण्याबद्दल प्रसिद्ध बंगाली दिग्दर्शक तपन सिन्हा यांची ख्याती आहे. हाटे बाजारे (गावच्या बाजाराची जागा) या त्यांच्या चालू वर्षीच्या राष्ट्रपतिपद · विजेत्या चित्रपटामध्येही याचे प्रत्यंतर येते.

सेवाभावी वृत्तीचा एक डॉक्टर – सदाशिव मुखर्जी (अशोक कुमार)–एका छोट्या खेड्यामध्ये गोर-गरिबांची सेवा करीत असतो. पैसा मिळवणे हा उद्देश नसल्याने काम भरपूर असते. डॉक्टर मुखर्जी यांना मूलबाळ नसते. घरात हृदयविकाराने आजारी असलेली पत्नी, एक नोकर आणि ड्रायव्हर अली, अशी तीनच माणसे असतात.

चिपली ही गावातील तरुण सुंदर विधवा. भाजीपाला विकून प्रामाणिक जीवन जगण्याचा ती प्रयत्न करीत असते. लक्ष्मनलाल हा गावातील श्रीमंत जमीनदार माणूस, श्रीमंतीबरोबर येणाऱ्या सव दुर्गुणांवर प्रभुत्व मिळवलेला. आता या तीन ठळक व्यक्तिरेखा समोर ठेवल्यावर सराईत प्रेक्षक आपल्या मताने पुढील कथाभाग निश्चित करू शकेल. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे डॉक्टर मुखर्जी यांच्या पत्नीचे निधन होते आणि डॉक्टरसाहेबांच्या हातूनच लक्ष्मनलाल मारला जातो. या नंतर मात्र कथा वेगळ्या वळणाने जाते. डॉक्टर मुखर्जी चिपलीला लक्ष्मनलालच्या अत्याचारापासून

शरद गोखले

सोडवताना जखमी होतो. आणि पुढे मरण पावतो. डॉक्टरला साहाय्य करणारा एक तरुण डॉक्टर, एक रिटायर्ड सब जज्ज आणि सेवाकार्यात थोडेफार कौशल्य मिळवलेली चिपली डॉक्टरांचे सेवाभावाचे व्रत पुढे चालू ठेवतात.

कथा अशी ही एवढीच. स्वाभाविकपणेच या चित्रपटात कथानकाला दुय्यम स्थान आहे. प्रसंगाची हळुवार खुलावट, आणि व्यक्तिरेखांचे जिवंत चित्रण याच ठळक बाबी. उदाहरणार्थ, चिपलीचा सोज्वळपणा, काहीशी फटकळ वागणूक, भावासंबंधी तिला वाटणारी माया, या बाबी सांगण्यासाठी आणि यातून तिची व्यक्तिरेखा जिवंत करण्यासाठी दिग्दर्शकाने मेहनत घेतली आहे. लक्ष्मनशी बोलताना तिने दाखवलेला फटकळपणा, तसेच त्याच्या श्रीमुखात मारण्यात दाखवलेले धैर्य या व अशा अनेक लहानमोठ्या प्रसंगांतून चिपलीची व्यक्तिरेखा सजीव होते.

लक्ष्मनची वृत्ती तर चित्रपटाच्या पहिल्याच दृश्यात पाहावयास मिळते. असहाय्यपणे धावणारी तरुणी आणि शिकाऱ्याच्या अभिवेषात तिच्या मागे घोडदौड करून तिचा बळी घेणारा लक्ष्मन यांतून प्रेक्षक लक्ष्मनसंबंधी निश्चित मत बनवतो. या मताला धक्का लागणार नाही अशा पद्धतीनेच लक्ष्मन चित्रपटात वावरताना आढळतो.

दिग्दर्शक या नात्याने तपन सिन्हा यांनी बजावलेल्या कामगिरीचा उल्लेख करणे आवश्यक आहे. वास्तववादी वातावरण, कलावंतांची सुंदर हाताळणी,

आणि डॉक्टर व चिपली यांचे प्रसंग हाताळताना त्यांनी दाखवलेला संयम यांमुळे चित्रपटाची कलात्मक पातळी उंचावली आहे. वास्तवतेचे उदाहरण म्हणून त्यांनी टिपलेल्या खेडेगावच्या बाजार दृश्यांच्या व बाह्य चित्रीकरणासाठी त्यांनी निवडलेल्या निसर्गाने नटलेल्या परंतु इतर सर्व दृष्टचा मागासलेल्या अशा 'स्पॉटस्'चा निर्देश करावा लागेल.

डॉक्टरांचा स्वयंपाकी, त्यांचा ड्रायव्हर अली, चिपलीचा माऊ, ही अगदी किरकोळ मंडळी; परंतु त्यांतील प्रत्येकजण आपले स्वतंत्र अस्तित्व जाणवून जातो. त्याचे बव्हंशी श्रेय दिग्दर्शकाकडेच जाते.

डॉक्टर आणि चिपली यांच्यांतील सर्वच प्रसंग वेचक आणि टोकदार आहेत. एकाही प्रसंगाला "घाणेरडा वास" येणार नाही अशी पूर्ण खबरदारी त्यांनी घेतली आहे आणि इतकही करून कुणाच्या मनात शंका असेलच तर तीही दूर व्हावी म्हणून डॉक्टरांच्या निधनानंतर कॅमेरा पॅन होतो; आणि क्षणभर स्थिरावतो; तो त्यांच्या मृत पत्नीच्या प्रतिमेवर. प्रत्यक्षात तिथे असलेल्या चिपलीची या वेळी कॅमेरा दखलही घेत नाही. चित्रपटाचा दर्जा उंचावतो तो डॉक्टर आणि चिपली यांच्यासंबंधी कटाक्षाने सांभाळलेल्या विशिष्ट पातळीमुळेच.

चित्रपटाचा तोल विघडणार नाही आणि कथा काहीशी संथ असली तरी ती योजलेल्या दिशेनेच अचूक वाटचाल करील अशी पूर्ण दक्षता घेतली असल्याने एक चांगला चित्रपट पाहिल्याचे समाधान निश्चितपणे मिळते.

प्रवाही कथानक असलेल्या चित्रपटांपेक्षा या चित्रपटाचे स्वरूप वेगळे असल्याने, चित्रपट बंगाली असूनही अशोककुमार–वैजयंतीमाला, यांसारख्या समर्थ कलावंतांची निवड केली असावी. लक्ष्मनच्या भूमिकेत अजितेश बॅनर्जी हा कलावंत आपला प्रभाव दाखवून जातो.

सर्वसाधारण चित्रपटांतून आढळून येणाऱ्या वैजयंतीमालाच्या अभिनयाच्या स्वरूपाशी या चित्रपटातील तिच्या अभिनय-कौशल्याची तुलना होऊ शकणार नाही. समर्थ दिग्दर्शक चांगल्या कलावंतांकडून किती सुंदर कामगिरी बजावून घेऊ शकतो, याचे हे उदाहरण आहे.

चित्रपटाची तांत्रिक बाजू उजवी आणि विषयापेक्षा आशयाची दखल घेणारी असल्याने निर्मितीचा दर्जा समाधानकारक वाटतो.

अवाढव्य खर्च करण्याची ताकद आणि प्रथम श्रेणीचे कलावंत असूनही अनेक हिंदी चित्रपट–निर्मात्या–दिग्दर्शकांना जे जमू शकत नाही, तेच बंगालमधील सत्यजित रे, ऋतविक घटक, मृणाल सेन, तरुण मुजुमदार यांच्यासारखे दिग्दर्शक आज सहजपणे करून दाखवतात, याचे मुख्य गमक म्हणजे या लोकांची चित्रमाध्यमावर असलेली विलक्षण पकड. तपन सिन्हांचा 'हाटे बाजारे' हे तर अगदी ताजे उदाहरण.

तपन सिन्हांना या व्यवसायात येऊन १५ वर्षे झाली. उमेदवारीच्या काळातील

अडचणींचे डोंगर ओलांडून त्यांनी आजचे यश मिळवले आहे. चित्रपट-सृष्टीतील त्यांचे आगमन ही पण योगायोगाची बाब नाही. चांगली बी. एस्सी. ची पदवी घेतल्यानंतर या व्यवसायातील अस्थिरतेची व अन्य अनंत अडचणींची कल्पना असूनही त्यांनी हेतुपूर्वक या व्यवसायाची निवड केली. १९२४ साली एका संपन्न जमीनदार कुटुंबात त्यांचा जन्म झाला. भागलपूर हे बिहारमधील गाव त्यांचे निवासस्थान. वयाच्या १८ व्या वर्षी इंटर सायन्स झाल्यावर स्वतःच्या भवितव्यासंबंधी स्वतः काही निर्णय घेण्यापूर्वीच वडिलांच्या इच्छेप्रमाणे तपनबाबू जाधवपूर विद्यापीठात इलेक्ट्रिकल इंजिनीयरिंगचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी दाखल झाले. हा व्यवसाय आपल्या प्रकृतीला मानवणारा नाही, ही वस्तुस्थिती वर्षभरात लक्षात आल्यावर त्यांनी शिक्षणक्रमाची गाडी पुन्हा मूळपदी आणली.

## न्यू थिएटर्समध्ये प्रवेश

या वेळेपर्यंत चित्रपटाविषयीचे त्यांचे आकर्षण वाढले होते, तथापि या आकर्षणाचे स्वरूप प्रेक्षक या नात्याने भरपूर चित्रपट पाहणे, इतकेच मर्यादित होते.

पदवी पदरी पडल्याशिवाय जीवनात सुस्थिरता येणार नाही, हे पिताजींनी अनेकवार सुनावल्यावर त्यांनी बी. एस्सी. साठी पुन्हा महाविद्यालयात प्रवेश केला. पदवी पदरी पडल्यावर आपल्या आवडीचा व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य त्यांनी वडिलांकडून मागून घेतले. याच वेळी चित्रपट पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोणही बदलला. प्रेक्षकाच्या भूमिकेतून तपनबाबूंची स्वारी अभ्यासकाच्या भूमिकेत गेली. पाहिलेल्या चित्रपटांची टिपणे घेणे, स्वतःच्या मनाप्रमाणे कथानकात बदल कल्पून कथानक पुन्हा लिहिणे, त्याच्या चित्रीकरणासंबंधी स्वतःच्या योजना तयार करणे, असे त्यांच्या अभ्यासाचे स्वरूप असे. याखेरीज चित्रपटविषयक अनेक पुस्तके विकत घेऊन त्यांनी तांत्रिक बाजूंचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. या उपक्रमामुळे अभ्यासाकडे फारसे दुर्लक्ष होणार नाही, अशी दक्षता घेतल्याने आपले शिक्षण पूर्ण करून त्यांनी १९४५ साली बी. एस्सी. ची पदवी पटकावली.

घरातील मंडळींच्या आपेक्षा वाढल्या. तपनबाबूंनी एम्. एस्सी. व्हावे यासाठी प्रयत्न सुरू झाले. हा मार्ग तरुण तपनला अजिबात मंजूर नव्हता. स्वतःच्या भवितव्याचे स्वप्न उराशी बाळगून तपन बाबू न्यू थिएटर्सच्या ध्वनिलेखन विभागात रुजू झाले. चित्रपट सृष्टीतील प्रथेप्रमाणे काम सुरू झाले. पण 'दामाचा' पत्ता नाही. महिना झाला, दोन महिने झाले. पण परिस्थितीत बदल झाला नाही. चांगली सहा महिन्यांची उमेदवारी झाल्यावर हा पोरगा 'लाईनला फिट आहे' असा विश्वास मालकांना आला आणि चार पैसे मिळू लागले. ध्वनिलेखनाच्या तांत्रिक बाजूंचे ज्ञान घेऊन सुमारे २ वर्षांनंतर तपनबाबू 'कलकत्ता मुव्हीटोन' या संस्थेत दाखल झाले. याच संस्थेच्या "परिवतर्न" या चित्रपटाच्या ध्वनिलेखनाची बाजू त्यांनी स्वतंत्रपणे सांभाळली. वर्ष-दीड वर्ष काम करूनही रस्ता मोकळा होईना, तेव्हा या

कंपनीला राम राम ठोकून १९४९ मध्ये स्वारी इंग्लंडला रवाना झाली.

इंग्लंडमध्ये चांगल्या संधीच्या अपेक्षेने त्यांनी दोन वर्षे वास्तव्य केले. तथापि चांगली संधी उपलब्ध होऊ शकली नाही. प्रत्यक्ष कामाला तर मुळीच वाव मिळाला नाही. परदेशांत जाऊन काही विशेष करण्याच्या आवेशाने इंग्लंड-अमेरिकेची वाट धरणाऱ्या अनेकांपैकी आपण एक अशी खात्री पटल्यावर तपनबाबू स्वदेशी परतले. पुढे या विषयासंबंधी बोलताना आपल्या विदेश वास्तव्याचा उल्लेख त्यांनी " Wasted Time " या शब्दांत केला.

भारतात आल्यावर मात्र अधिक वेळ घालवण्याच्या मनःस्थितीत ते नव्हते. गाठी अनुभव पुष्कळ होता. मनात कल्पनाही खूप होत्या, आवश्यकता होती ती कृतीची. सुदैवाने पैशाचे बकळ पाठबळ असल्याने त्यांनी स्वतः निर्मिती क्षेत्रात उतरण्याचे ठरवून १९५१ मध्ये ' अंकुश ' या आपल्या पहिल्या चित्राचा मुहूर्त केला. चित्रपटाचा विषय होता, एका संस्थानिकांचा गजराज. ' गजराज ' नायक असलेल्या या त्यांच्या पहिल्याच चित्रपटाची जाणकारांनी वाखाणणी केली. तरी प्रेक्षकांनी मात्र चित्रपटावर जणू बहिष्कार घातला. पहिल्या चित्रपटाला अपयश येऊनही ते खचून गेले नाहीत, की पुढे मिळालेल्या यशाची धुंदी त्यांना चढली नाही. अपयश पचवून त्यांनी वाटचाल चालू ठेवली. परंतु स्वतः चित्रनिर्मिती करण्याच्या मोहापासून मात्र ते सतत दूर राहिले.

१९५१ ते १९६८ या १७ वर्षांच्या काळात त्यांनी सतरा चित्रपट देऊन त्यांच्या रसिक चाहत्यांना संतुष्ट केले. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांपैकी ' काबूलीवाला ' १९५६ या चित्रपटाला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. बर्लीनच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातही या चित्रपटाने रौप्यपदक पटकावले. " क्षुधित पाषाण " (Hungry Stones) या त्यांच्या चित्रपटानेही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान मिळवले.

हसूळी बंकेर उपकथा (नदीकाठच्या लोककथा) या चित्रपटाचीही अनेक जाणकारांकडून वाखाणणी झाली.

## यशाचे रहस्य

चित्रपटाच्या यशापयशाचे बव्हंशी श्रेय दिग्दर्शकाकडे असते. (Director's Cinema) असे मानणारांपैकी तपनबाबू आहेत. आपल्या चित्रपटांची पटकथा, संवाद व शॉट डिव्हिजन ते स्वतः लिहितात. धंदा आणि कला यांचे ओढून ताणून मेतकूट बनवण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. काही चित्रपट केवळ धंद्याचा दृष्टिकोण ठेवून तर काही चित्रपटांच्या संदर्भात आर्थिक अपयशाची तयारी ठेवून त्यांनी कामगिरी स्वीकारली. तथापि त्यांच्या दुसऱ्या गटातील चित्रपटांचाही प्रेक्षकवर्ग तयार झाल्याने पहिल्या चित्रपटाचा अपवाद वगळता त्यांना अपयश आलेले नाही. लोहा कपाट (लोखंडी चौकट), काला माती, या त्यांच्या चित्रपटांना त्यांना

स्वतःला कल्पना नसूनही आर्थिक यश मिळून गेले. एका संगीतवेड्या तरुणाची कथा त्यांनी ' अतिथी 'मध्ये सांगितली. त्यांच्या या चित्रपटाचे अभूतपूर्व स्वागत झाले.

' हाटे बाजारे ' या त्यांच्या अगदी अलीकडच्या चित्रपटासाठी त्यांनी हिन्दीतील नाणावलेले कलावंत घेतले. तथापि चित्रपटाला मात्र हिन्दी चित्रपटांचे बाजारी स्वरूप येऊ दिले नाही. अन्यथा लक्ष्मनलालच्या चंगीभंगीपणाचे निमित्त करून त्यांना एखाद दुसरे ' हेलन टाईप ' नृत्य निश्चित घुसडता आले असते. फार कशाला नृत्यांगना म्हणून नावाजलेली वैजयन्तीमाला प्रमुख भूमिकेत असूनही वाव नसल्यामुळे तिचे नृत्य त्यांनी आपल्या चित्रपटात घुसडले नाही. प्रारंभापासून अखेरपर्यंत चित्रपटाची वास्तववादी पातळी त्यांनी सोडली नाही.

बंगालच्या अन्य दिग्दर्शकांपैकी सत्यजित, ऋतविक घटक, आणि पी. चौधरी, हे त्यांचे आवडते दिग्दर्शक ' पथेर पांचाली ' आणि ' अपराजितो ' सारखे जगन्मान्यता पावलेले चित्रपट बंगालमध्ये तयार झाले याचा त्यांना अभिमान आहे.

असा हा थोर कलावंत कलेच्या नवीन क्षितिजांचा वेध घेत हिंडत आहे. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात परीक्षक म्हणून काम करण्याचा बहुमान त्यांनी मिळवला. अनेक देशांचे दौरे करून अनुभवांची कक्षा रुंदावली. पण या सर्वांबरोबर आपला गरजू स्वभावही जोपासला म्हणूनच बंगालमधील नाणावलेले तंत्रज्ञ त्यांच्या हाताखाली काम करणे भाग्याचे समजतात.

विमल रॉय यांच्या निधनानंतर हिंदी चित्रपटसृष्टीत कलात्मक चित्रपटांची निर्मिती थंडावली आहे. कलकत्यात राहून बंगाली चित्रपट निर्माण करणाऱ्या सत्यजित, तपन, ऋतविक अथवा मृणाल यांपैकी एखादा तरी सध्या मुंबई चित्रपट धंद्यात यायला पाहिजे. अधूनमधून तशी हाकाटी येते. ती कधी तरी प्रत्यक्षात उतरेल अशी अपेक्षा बाळगू या.

○

# आपण माहेरचे वार्षिक वर्गणीदार आहात काय ?

वार्षिक वर्गणीदार होणाऱ्या वर्गणीदारांना एक उपयुक्त भेट

## माहेर दैनंदिनी १९६९



### दैनंदिनीची वैशिष्ट्ये

- महाराष्ट्रीय गृहिणींना उपयुक्त ठरेल अशी बहुविध माहिती या दैनंदिनीत समाविष्ट करण्यात आली आहे
- आकार ( ५″ × ७″ ) पुस्तकाचा
- तारखांची सुमारे २०० पृष्ठे
- प्लॅस्टिकचे सुबक आवरण
- थोडक्यात म्हणजे आपल्याला वर्षभर उपयोगी पडू शकेल अशी वैशिष्ट्यपूर्ण भेट

### दैनंदिनी कोणास मिळू शकेल?

- दिनांक १० डिसेंबर ६८ पूर्वी **माहेर** मासिकाचे जानेवारी १९६९ ते डिसेंबर १९६९ या वर्षभराच्या मुदतीसाठी वार्षिक वर्गणीदार होणाऱ्या आमच्या वाचकभगिनींना ही दैनंदिनी ( विनामूल्य ) सप्रेम भेट म्हणून डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात पाठवू.
- वार्षिक वर्गणी रु. १५ + रु. १ ( रजिस्टर पोस्टाने पाठविण्याच्या खर्चासाठी ) अशी एकूण रु. १६ ची रक्कम मनिऑर्डरने त्वरित पाठवावी.

**मेनका प्रकाशन** ■ ५६० नारायण पेठ, पुणे २

IMPRESS D / 36

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## दि. ७ ते १३ डिसेंबरचे राशी-भविष्य

**मेष** : सध्याची आपली ग्रहस्थिती फारशी चांगली नाही. आणि अशीच वेळ तुमच्या सुप्त शक्ति-सामर्थ्याला जाग आणणारी असते. याचाच अर्थ असा की, या वेळीच तुमच्या कर्तृत्वाला उत्थान मिळू लागेल. सध्याच्या अनिष्ट ग्रहस्थितीचा धक्काच तुमच्यातील संवेदना निर्माण करणारा ठरेल.

या आठवड्यातील गुरू-हर्षल युतीवर (दि. ११) सारे लक्ष केंद्रित करा. शिक्षण क्षेत्रात-व्यवसायधंद्यांत अनन्यसाधारण यश मिळवून दाखवाल.

प्रवास घडेल, अनपेक्षितपणे प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील.

दि. ११ ते १३ अपेक्षेबाहेर यशस्वी व्हाल.

**वृषभ** : ग्रहांचे दान हवे तसे पडू लागलेले असल्यामुळे, सध्या तरी निदान वृषभ-राशी व्यक्ती गतिमान जीवन जगत आहेत असं म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

प्रामुख्याने या वेळचा गुरू-हर्षल योग—कधी काळी ८४ वर्षांनंतर अंतरिक्षात घडून येणारा—या वेळी तुमच्या वाट्यास आलेला आहे. तो तुम्हांला हवं ते देऊन जाईल. नोकरीधंद्यांत सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल, अपेक्षेप्रमाणे उच्च स्थानही मिळून जाईल. कीर्ती, प्रतिष्ठा, धन या साऱ्या बाबतींत अपेक्षासाफल्याचा हा काल आहे असं आपणांस वाटू लागेल.

दि. ११–१२–१३ अत्युत्तम यशदायक काल.

**मिथुन** : कोणी कसाही असो, चौथ्या मंगळाचे धक्के जाणवले नाहीत असा मनुष्य क्वचितच आढळेल. तुम्हीही त्याला अपवाद नाही. गेल्या १५–२० दिवसांत आपणांस सतत झगडावे लागले असेल. सांपत्तिक ताण असह्य झाला असेल.

सध्याचा काल थोडाफार आशादायक अनुभवण्यास मिळेल. दि. १८ ला मंगळाचे राश्यंतर घडेल आणि मगच तुम्ही परिस्थितीवर खरा विजय मिळवू शकाल.

व्यावसायिक समस्या सुटू लागल्याची लक्षणे दिसू लागतील, उद्योगधंद्याचे बदललेले तंत्र यशस्वी ठरत असल्याचा साक्षात्कार घडू लागेल. कौटुंबिक अनारोग्य निवळू लागेल. दि. ७–११–१३ हे दिवस अनुकूल जाणवू लागतील.

**कर्क** : गुरू-मंगळ आणि हर्षलही एवढे समर्थ ग्रह आणि तेसुद्धा पराक्रमस्थानी, असा पर्वकाल तुम्ही तुमच्या हयातीत आताच अनुभवीत आहात. अनेक क्षेत्रांत आपण विक्रम करून दाखवला असेल. ही आत्यंतिक ग्रहस्थिती फक्त ४–८ दिवसच तुम्हांला अनुभवावयास मिळेल. मंगळ एकदा चतुर्थात आला की, तो तुम्हांला अपेक्षित यश मिळू देणार नाही.

या आठवड्यात एकाएकी प्रवास घडेल, नोकरीधंद्याचे क्षेत्र बदलेल. जबाबदाऱ्यांचे ओझे वाढू लागेल, प्राप्ती घटण्याची दुश्चिन्हे दिसू लागतील. तेव्हा मला स्पष्टपणे एवढेच सुचवायचे आहे की, जे जे करायचे असेल ते ते फक्त याच वेळी.

दि. ९–११–१२ आशादायक दिवस.

**सिंह :** आपल्या प्रतिष्ठेला आणि अधिकाराला या वक्री शनीने खूपच धक्के दिले असले तरीही आपण आपले आसन ढळू दिले नाहीत यातच आपल्या कर्तृत्वाच्या महत्तेचे दर्शन घडते. अनिष्ट कालावर विजय मिळवू शकतात फक्त सिंहराशी व्यक्तीच.

आता पुढच्याच आठवड्यात मंगळ आपल्या पराक्रमस्थानी येणार आहे. तो तुमचे आजवरचे अपयश धुऊन काढील. या आठवड्यापासूनच भविष्यकालीन अनुकूलतेची प्रसादचिन्हे दिसायला लागतील. अनपेक्षितपणे मोठ्या प्रमाणावर पैसा हाती येईल, प्रवास घडेल, नव्या योजना यशस्वी करण्यासाठी कंबर बांधाल.

दि. ७–८–१२–१३ चांगल्या संस्मरणीय घटना घडतील.

**कन्या :** गुरू-हर्षल ही क्वचित कधीतरी घडणारी ग्रहस्थिती दि. ११ ला तुमच्या राशीतच घडून येत आहे. शनीच्या अनिष्टतेला ती छेद देईल एवढेच नव्हे तर नव्या आशा अंकुरायला तिचा आपणांस उपयोग होऊ लागेल.

या वेळी आपण शिकस्तीचा प्रयत्न केलात तर कधीही न मिळालेले यश या वेळी सहजासहजी पदरी पाडून घेता येईल.

भागीदारीतील संघर्ष मिटेल, सांपत्तिक ताण निश्चितच कमी होईल, इष्टमित्रांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल, मंगल कार्याचे विचार आकार घेऊ लागतील.

दि. ९–११–१३ अपेक्षित लाभ-यश देणारा काल.

**तूळ :** आजवर प्राणपणाने आपण जीवनमूल्यांचे जतन केलेत. थोडेफार यश आलेही. गुरू-मंगळ व्ययात असेपर्यंत अजूनही आपणांस झगडावे लागणार आहे.

या आठवड्यातील गुरू-हर्षल युतीचा थोडाफार अनुकूल परिणाम आपल्या व्यवसायधंद्यावर घडावा. पण अविश्रांत परिश्रमांशिवाय काहीही फारसे पदरी पडणार नाही. दूरच्या प्रवासाचे शक्यतो टाळा. फार मोठ्या–न पेलण्यासारख्या–जबाबदाऱ्या उचलण्याच्या भानगडीत पडू नका.

राजकीय–सामाजिक क्षेत्रांत तर चुकूनही पाऊल टाकू नका.

दि. ७ ते ९ हे दिवस फारच घाईगर्दीचे जाणवतील.

**वृश्चिक :** आजवर आपणांसाठी आम्ही काही करू शकलो नाही. आता आपल्या अपेक्षेबाहेर काही करावे अशीच या वेळच्या ग्रहस्थितीची आंतरिक इच्छा दिसते.

लाभस्थानी गुरू-हर्षल युती (दि. ११). तुमच्या ह्यातीत आताच आणि एकदाच हा योग घडून येणार असल्यामुळे, अनपेक्षितपणे अनेक मोठाले लाभ पदरी पडतील. नोकरीधंद्यात नेत्रदीपक प्रगती घडून येईल. कला–साहित्याच्या क्षेत्रात

तुमची प्रतिष्ठा खूपच उंचावू लागेल. या वेळी अंतरिक्षात असा कोणताही ग्रह नाही की, जो तुमच्यावर नाराज आहे.

दि. ९-१०-११ अपेक्षासाफल्याचे दिवस.

**धनू** : आपले वातावरण पूर्णत्वाने निवळले नसले तरी, गेल्या १५-२० दिवसांच्या मानाने हे दिवस निश्चित स्वास्थ्याचे, प्रगतीचे आणि उत्साहाचे जाणवतील, अशी आशा करायला भरपूर जागा आहे.

सूर्य-मंगळाचे लवकरच राश्यंतर घडणार आहे, आणि ती बदलती स्थिती तुमच्याही जीवनात क्रांती घडवून आणण्यास कारण ठरावी.

नोकरीधंद्यात प्रगतीची लक्षणे दिसू लागतील. इष्टमित्रांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल. कौटुंबिक अनारोग्य, सांपत्तिक विवंचना इ. सारे प्रकार संपुष्टात यावेत.

दि. ८-१०-१३ काही गोष्टींत चांगले यश लाभावे.

**मकर** : या कालात अत्यंत यशस्वी आणि भाग्यवान माणसे फक्त मकर राशीचीच. या काली ते कुठेही गेले तरी त्यांचा सत्कार घडेल. कसेही पाऊल टाकले तरी ते पवित्र्यातच पडेल. औद्योगिक क्षेत्रात तर यशच तुमचा पाठलाग करू लागेल.

याच आठवड्यात मंगलकार्यासंबंधी निर्णायक अवस्था प्राप्त होईल. नोकरीधंद्यासाठी काही प्रयत्न केलेले असतील तर ते प्रयत्न याच आठवड्यात अपेक्षेबाहेर यश घेऊन उठतील.

प्रवास घडेल. तुम्हांपैकी काहींना परदेशास जाण्याची संधी लाभेल. पैसा, प्रतिष्ठा, सामाजिक मान्यता सर्व काही लाभेल.

दि. ९-११-१३ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कुंभ** : आठव्या मंगळाची अनिष्टता आता ओसरू लागली आहे. आता सहसा तुमचे कशातच नडू नये. मंगळ नवमस्थानी येताच आपले सारे प्रयत्न आकार घेऊ लागतील. पुढच्याच आठवड्यात सूर्य एकादशात येत असल्यामुळे अनपेक्षितपणे अनेक लाभही पदरी पडतील.

डिसेंबरच्या मध्यापासून तुमच्या कर्तृत्वाला धार चढू लागेल. साडेसाती आता आहे नाही सारखीच. प्रकृती, पैसा, प्रतिष्ठा या साऱ्यांबद्दलच्या विवंचना मिटू लागतील. नोकरीधंद्यात नेत्रदीपक यश मिळू शकेल.

दि. ११ ते १३ अनेक अनुकूल घटना घडू लागतील.

**मीन** : आपली अनिष्टता संपली नाही, पण निश्चितपणे ओसरू लागलेली आहे. या वेळी आपण कोणत्याही कामाबद्दल प्रयत्नशील राहिलात तर आपले प्रयत्न वाया जाणार नाहीत.

उद्योगधंद्याचे स्वरूप अधिक आकर्षक दिसू लागेल. अनेकांचे सहकार्य पदरी पडेल. भागीदारीतील संघर्ष मिटण्याची लक्षणे दिसायला लागतील.

आपल्या प्रगतीला पोषक अशा घटना भराभर घडून यायला लागतील. साडेसातीबद्दल धास्ती बाळगण्यासारखा काल खासच नाही.

दि. ११-१२-१३ नव्या आशा अंकुरायला लागतील. ○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd No. M H-649

## "सारे जग श्वास रोखून बसेल"

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७-बी, कोथरूड, पुणे ४, येथे छापून, ४१९. नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर,**